
कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. ५ सप्टेंबर २०२४

किंमत ४ ₹

## वसंतराव ओसवाल यांचे निधन



**पाली :** शरद पवार यांचे निकटवर्तीय राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष तथा सुधागड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंतराव ओसवाल यांचे बुधवारी (दि.४) दुपारी पुण्यातील हॉस्पिटलमध्ये वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८२ वर्षाचे होते.त्यांचे अंत्यविधी आज गुरुवारी सकाळी ठीक ११:३० वाजता पाली येथील स्मशानभूमीत होणार आहे. एक अभ्यासू आणि सभ्य राजकीय व्यक्तिमत्वास संपूर्ण तालुका मुकला आहे. मागील काही दशक त्यांनी पान २ वर

## बेल्ट गळ्याला लागल्याने मृत्यू

**अंबरनाथ :** आईसोबत गेलेल्या ३ वर्षाच्या चिमुरड्याचा कंपनीतील सुरू असलेल्या बिस्कीट बनवणाऱ्या मशीनचा बेल्ट गळ्याला लागून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे मशीनच्या बेल्टवरून जाणारे बिस्कीट उचलण्यासाठी हा चिमुरडा गेला असता ही घटना घडली आहे.

ही घटना अंबरनाथ आनंद नगर भागात असलेल्या एमआयडीसीमधील एका बिस्कीट कंपनीत घडली आहे. याप्रकरणी अंबरनाथ पूर्वेतील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. आयुष्य चौहान (वय ३) असे मृत चिमुरड्याचे नाव आहे.

**आजचा अग्रलेख**
**जातगणनेच्या दिशेने**

**वेधक**

## श्रीवर्धनमध्ये आग

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन बाजारपेठेतील दादर पुलावर असलेली पिठाची व मसाल्याची वजगरे बंधू यांची गिरण शॉर्टसर्किट झाल्यामुळे पूर्णपणे जळून खाक झाली आहे. ज्यावेळी या ठिकाणी आग लागली, त्यावेळी मोठमोठे स्फोटासारखे आवाज झाल्याचे नागरिकांनी सांगितले. श्रीवर्धन शहरात अत्यंत जुनी अशी ही मसाल्याची व पिठाची चक्की गेल्या अनेक वर्षांपासून अस्तित्वात होती. तळमजल्यावर पिठाची चक्की असून संपूर्ण वजगरे कुटुंब या चक्कीच्या वरच्या मजल्यावरती राहत होते. परंतु श्रीवर्धन नगर परिषदेच्या अग्निशमन दलाने वेळीच आग आटोक्यात आणल्यामुळे पुढील अनर्थ टळला आहे. या अग्नितांडवांमध्ये जीवितहानी झाली नसली तरी पान २ वर

## कारच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**मालाड :** मालाड भागात एका कारने महिलेस कारखाली चिरडले आणि डिव्हायडरपर्यंत खेचत नेले आहे. अपघातात महिलेचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मेहंदी क्लास संपवून पायी घरी जाणाऱ्या महिलेला कार चालकाने धडक दिली. प्रत्यक्षदर्शी आणि कार चालकाने महिलेला रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. मात्र उपचारापूर्वीच महिलेचा मृत्यू झाला. कारचालक मर्चंट नेव्हीमध्ये सेवेला असल्याचे कळते. नागरिकांकडून कारचालकाला बेदम मारहाण करण्यात आली आहे. मारहाण झाल्याने चालकदेखील गंभीर जखमी झाला आहे. चालकाने पान २ वर


# नुकसानभरपाईला ठेंगा

## अतिवृष्टीत २ कोटी ६० लाख रुपयांचे नुकसान

**प्रमोद जाधव**
**| अलिबाग |**

जुलै महिन्यात झालेल्या अतिवृष्टीत दोन कोटी ६० लाख ४३ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीचा अहवाल जिल्हा प्रशासनाने मागील महिन्यात शासनाला पाठविला आहे. महिन्याभरापासून शासनाच्या कार्यालयात हा प्रस्ताव पडून आहे. या भरपाईची प्रतीक्षा नुकसानग्रस्तांना लागून राहिली आहे. ही भरपाई कधी मिळणार, असा सवाल नुकसानग्रस्तांकडून व्यक्त केला जात आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सात जुलैला पावसाने जोरदार सुरुवात केली. जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत पावसाचा धुमाकूळ सुरुच राहिला. वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस जिल्ह्यामध्ये कोसळला. या पावसात भात पिकाचेदेखील प्रचंड नुकसान झाले. भात लागवडीसाठी असलेली रोपे पाण्यात वाहून गेली. काही रोपे कुजून गेली. पान २ वर




मागील महिन्यात ११ ऑगस्टला शासनाला हा प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. परंतु एक महिना होण्यासाठी अवघे सहा दिवस शिल्लक राहिले आहेत. तरीदेखील शासनाकडून नुकसानग्रस्तांना भरपाई मिळाली नाही. शासनाच्या कार्यालयात हा प्रस्ताव धुळखात पडून आहे. शासन वेगवेगळ्या योजनांच्या जाहीरातीमध्ये मशगूल असल्याने जिल्ह्यातील नुकसानग्रस्तांना भरपाई मिळण्यास विलंब होत असल्याची चर्चा जोरात रंगत आहे. भरपाई लवकर मिळेल अशी नुकसानग्रस्तांना आशा होती. परंतु आणखी भरपाईसाठी किती दिवस वाट पहावी लागणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# २५ सप्टेंबरपर्यंत 'जंजिरा' होणार खुला

## मुरूड-अलिबाग पुरातत्व विभागाचे अधिकारी बजरंग येलीकर यांची माहिती

**| मुरूड | प्रकाश सद्रे |**

पावसाळ्यात पर्यटकांसाठी बंद करण्यात आलेला मुरूडचा प्रसिध्द जंजिरा जलदुर्ग एकूण परिस्थिती पाहून २५ सप्टेंबरपासून पर्यटकांना पाहण्यासाठी खुला करण्यात येईल, अशी माहिती मुरूड-अलिबाग पुरातत्व विभागाचे अधिकारी बजरंग येलीकर यांनी बुधवारी बोलताना दिली. पर्यटक आणि पर्यटन व्यावसायिक जंजिरा खुला होण्याची प्रतीक्षा करीत आहेत. कारण अनेकांचा उदरनिर्वाह पर्यटन व्यवसायावर अवलंबून आहे.

पावसाळ्यात जंजिरा जलदुर्गात ठिकठिकाणी उंच गवत, झाडे झुडपे, वेली मोठ्या प्रमाणात वाढल्या असून अस्वच्छतेचा विळखा पडला आहे. यामध्ये विषारी सापांचा, अन्य सरपटणाऱ्या प्राण्यांचा संचार असल्याने ही वाढलेली झाडी काढून जलदुर्गात स्वच्छता प्रथम करावी लागणार आहे. शिवाय खवळलेल्या समुद्रातील लाटांच्या पाण्याचा वेग पाहणेदेखील महत्वाचे आहे. सर्व अंदाज घेता पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आतून स्वच्छता अत्यंत महत्वाची जवाबदारी असून याला आम्ही प्रथम प्राधान्य देणार आहोत. सध्या पाऊस पडत असल्याने जंजिऱ्याची अंतर्गत स्वच्छता करण्यासाठी अडथळे येत आहेत. स्वच्छता आणि अनुकूल परिस्थिती निर्माण झाल्यास जंजिरा जलदुर्ग २५ सप्टेंबरच्या आधीदेखील खुला केला पान २ वर



## राष्ट्रपतींच्या हस्ते माजी आ. बाळाराम पाटील यांचा गौरव

# उत्कृष्ट भाषण पुरस्कार प्रदान




**| मुंबई | प्रतिनिधी |**

शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार बाळाराम पाटील यांना विधान परिषदेत समाजाचे विविध प्रश्न मांडल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विधान भवनात झालेल्या भव्य कार्यक्रमात सन २०२०/२१ सालचा उत्कृष्ट भाषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

विधानसभा आणि विधान परिषदेतील ५३ आमदारांना राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते गौरविण्यात आले. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शतक महोत्सवानिमित्त वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आणि महत्व ग्रंथाचे प्रकाशन तसेच उत्कृष्ट संसदपटू व उत्कृष्ट भाषण पुरस्कारांचा वितरण समारंभ मुंबईतील विधिमंडळातील मध्यवर्ती सभागृहात पार पडला.

राष्ट्रपती मुर्मू यांनी त्यांच्या भाषणाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जय जयकाराने केली. महिलांच्या विकासाशिवाय देशाचा विकास होणं शक्य नाही. स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्राचे मोठे योगदान आहे. ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार राहिलेल्या महाराष्ट्राने देशात अनेक कायदे, सुधारणांची मुहूर्तमेढ रोवली आहे. सध्याच्या काळात उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे या पान २ वर

# असंख्य कार्यकर्ते शेकापमध्ये

- **चित्रलेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्षप्रवेश सोहळा**



**| अलिबाग | प्रतिनिधी |**

शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यप्रणालीवर खुश होऊन वावे पोटगे, वावे खार मुंबई महिला मंडळ यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला आहे. शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि.३) मुंबई येथील गझधर बांध सांताक्रुझ येथे पक्षप्रवेश सोहळा पार पडला. नवनिर्वाचित कार्यकर्त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

यावेळी मुंबईतील युवा नेत्या साम्या राजेंद्र कोरडे, अलिबाग तालुक्यातील रामराजचे माजी सरपंच मोहन धुमाळ, झावरे,प्रकाश पनवेलकर, भालचंद्र पाटील, विश्वास मालुसरे, विनायक तांबडकर, विकास पाटील, गणेश तांबडकर, गितेश भायतांडेल, अक्षय ढिकले, नितिन जानकर, महिला मंडळ पान २ वर

## सुधीर चेरकरच्या मागे पोलीस

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

रेवदंडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात घुसून एका महिलेला शिवीगाळी करून मारहाण केल्याप्रकरणी फरार असलेल्या भाजप पदाधिकाऱ्याच्या मागे पोलीस हात धूऊन मागे लागले आहेत. गेल्या चार दिवसांपासून तो फरार आहे. त्यामुळे रेवदंडा पोलीस त्याच्या शोधात आहेत. त्यासाठी दोन पथके तयार करण्यात आली आहेत.

कौटुंबिक वादातून मारहाणीत पतीला दुखापत झाली होती. त्यामुळे रेवदंडा येथील प्राथमिक पान २ वर

# एसटी संपाचा फटका

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

प्रलंबित मागण्यासाठी महाराष्ट्र एसटी संयुक्त कृती समितीच्यावतीने मंगळवारपासून संप सुरु करण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यात या संपाला अल्प प्रतिसाद असला, तरीदेखील संपाचा एसटीला फटका बसला आहे. एक हजार ९९८ पैकी ३०४ कर्मचारी संपात सामील झाले आहेत. त्यामुळे गणेशोत्सवात प्रवाशांचे हाल झाले असून २८ लाख रुपयांचा तोटा एसटीला सहन करावा लागला आहे पान २ वर

> संपात दीड हजारच्या आसपास कर्मचारी सामील झाले आहेत. परंतु गणेशोत्सवात गावी जाणाऱ्या प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी नियोजन केले आहे. आगार व्यवस्थापकांशी संपर्क साधून प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जात आहे.
>
> – दिपक घोडे, विभाग नियंत्रक, एसटी महामंडळ रायगड विभाग



# पनवेलमध्ये शेकापचा मेळावा




- **नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी लावली उपस्थिती**
- **माजी आ. बाळाराम पाटील यांचे मार्गदर्शन**

**| पनवेल | प्रतिनिधी |**

शेकापतर्फे पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मंगळवारी (दि.३) नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्याचे आयोजन केले होते. यावेळी ज्येष्ठ नेते, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती नारायण घरत, पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती काशिनाथ पाटील, पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, तालुका चिटणीस राजेश केणी, जि.प. सदस्य विलास फडके, रामेश्वर आंग्रे, नगरसेवक अरविंद म्हात्रे, विष्णू जोशी, ज्ञानेश्वर पाटील,पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक देवेंद्र मढवी, महिला आघाडीच्या अनुराधा ठोकळ, प्रीती जॉर्ज-म्हात्रे, सुरेखा मोहोकर, सारिका भगत यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते या मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माजी आ. बाळाराम पाटील म्हणाले कि, शेकापने सदैव अन्याय आणि अत्याचार विरोधात संघर्ष करून जनतेला न्याय दिला आहे. काही लोक वैयक्तिक स्वार्थासाठी पान २ वर

# त्यांच्या स्वागतासाठी आम्ही तयार आहोत

- **शरद पवारांचे सूचक विधान**
- **राष्ट्रवादीत प्रवेशासाठी इच्छुकांची गर्दी**

**| कोल्हापूर | वृत्तसंस्था |**

अनेक नेते पक्षात येण्यासाठी इच्छुक आहेत. मात्र आम्ही स्थानिक नेत्यांशी चर्चा करूनच निर्णय घेत आहोत. पक्षात येणाऱ्यांची उपयुक्तता, त्यांचे सामाजिक क्षेत्रातील काम, स्वच्छ कारभार पाहून नेत्यांना प्रवेश दिला जाणार आहे. त्यामुळे असे जे नेते पक्षात येण्यास इच्छुक आहेत, त्या सर्वांच्या स्वागतासाठी आम्ही सज्ज आहोत, असे शरद पवार कोल्हापूर येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत म्हणाले. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीमधील अनेक नेते पुन्हा एकदा राष्ट्रवादी आणि काँग्रेसकडे येत आहेत. कागलचे भाजपा नेते समरजीत घाटगे यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केल्यानंतर इंदापूरचे नेते आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील हेही राष्ट्रवादीत येणार असल्याची चर्चा आहे. यावर बोलत असताना शरद पवारांनी सूचक विधान केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरत लुटली नव्हती, असे विधान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. पान २ वर

## गणेशमूर्ती व्यवसायात ७० बचतगटांची गरुडझेप

# 3 कोटींची केली उलाढाल

**| रायगड | प्रतिनिधी |**

जिल्ह्यातील पेण तालुक्यातील ७० महिला बचतगटातील महिलांनी उमेद अभियान अंतर्गत गणपती मूर्ती व्यवसायात पाऊल ठेवले आहे. या व्यवसायातून महिलांना आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले आहे. बचत गटातील महिलांनी सुमारे ३५ हजार गणपती मूर्ती तयार केल्या असून, यामधून त्यांनी २ कोटी ८९ लाख ५० हजार रुपयांची उलाढाल केली आहे.

रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे यांनी बचतगटातील महिलांना व्यवसायाच्या दृष्टीने मार्गदर्शन केल्याने, जिल्ह्यातील महिला शक्ती गणपती मूर्ती व्यवसायात गरुडझेप घेऊ शकल्या आहेत.

रायगड जिल्ह्यातील पेण तालुका गणपती मूर्तींचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. पेणमध्ये तयार केलेल्या गणपती मूर्तींना देश, विदेशात मोठी मागणी आहे. सुबक आखणी, नेटकी बैठक, सुंदर कोरीवकाम, पान २ वर



### छत्रपती संभाजीनगरमधील महिलांनी घेतले प्रशिक्षण

पेणमधील महिला बचतगटांचा गणपती मूर्ती व्यवसायाचा अभ्यास करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथील बचतगटातील महिलांची अभ्यास दौरा काही दिवसांपूर्वी आयोजित करण्यात आला होता. यामध्ये १०० महिला सहभागी होत्या. या महिलांनी गणपती मूर्ती आखणी, बांधणी रंगकाम याचे प्रशिक्षण घेतले.

> माझे पती गणपती मूर्ती तयार करायचे. दरम्यानच्या काळात आम्ही महिलांनी एकत्र येत महिला बचतगट स्थापन केला. यांनतर आम्ही प्रभाग संघात दाखल झालो. आम्ही बचतगटांच्या माध्यमातून गणपती मूर्ती बनविण्याचा व्यवसाय सुरु करण्याचे ठरविले. यासाठी आमच्या कुटुंबाचे तसेच जिल्हा परिषदेचे सहकार्य लाभले. पेण तालुक्यातील बचतगटातील महिलांनी मोठ्या प्रमाणात गणपती मूर्ती तयार केल्या आहेत. यामुळे महिलांना रोजगार प्राप्त झाला असून, आर्थिक स्थैर्य मिळण्यास मदत झाली आहे.
>
> – प्रियांका पाटील, श्री. दत्तकृपा महिला स्वयंसहाय्यता गट.



# अखेर कोलाड रोहा रस्त्यावर पथदिव्यांचे काम युद्धपातळीवर

## गणपती उत्सवापूर्वी रस्त्यावर लखलखाट होणार

**। कोलाड । वार्ताहर ।**

**मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ ला जोडणारा कोलाड–रोहा राष्ट्रीय मार्ग या मार्गाच्या दोन्ही बाजूंनी पथदिवे बसविण्यासाठी तीन महिन्यांपूर्वी मार्किंग केली आहे. परंतु अद्याप ही या मार्किंगला नाही पोल बसविले की नाही पथदिवे लागले. यामुळे या मार्गावर अंधार असल्यामुळे चोरीचे प्रकार तसेच अपघाताचे प्रमाण वाढले असल्याची बातमी दै. कृषिवलमधून प्रकाशित झाल्यानंतर १५ दिवसात दखल घेऊन पथदिवे बसविण्याचे काम जलद गतीने सुरु केले असुन दोन ते तीन दिवसात हे काम पूर्ण होण्याचे संकेत मिळत आहेत.**




कोलाड रोहा मार्गावर धाटाव औद्योगिक क्षेत्र असल्यामुळे या मार्गावर सतत वाहनांची वर्दळ सुरू असते. सेकंड शिफ्टवरुन सुटणारे कामगार तसेच रात्रपाळीला जाणारे कामगारांची दुचाकीवरून येणाऱ्यांची संख्या ही मोठ्या प्रमाणात असून या मार्गाच्या बाजूला काही ठिकाणी मोठी झाडे आहेत. शिवाय या मार्गाच्या रस्त्याचे काम अतिशय उत्तम प्रकारचे झाले आहे. यामुळे या मार्गावर सुसाट जाणाऱ्या वाहनांमुळे अपघात होऊ नये म्हणून रस्त्याला जागोजागी गतिरोधक बसविले आहेत. परंतु या रस्त्यावर अंधार असल्यामुळे येणारी जाणारी वाहने दिसत नाही. यामुळे अनेकवेळा या म ार्गावर अपघात होत आहे.

कोलाड रोहा मार्गावर पथदिवे नसल्यामुळे दररोज चोरीचे प्रकार वाढले असून या मार्गावरून एक महिन्यांपूर्वी मिथुन जैन यांची १३ हजार रुपयांची सायकल तर पाच दिवसापूर्वी आंबेवाडी येथील राम दास लोखंडे यांच्या पान टपरीतुन रोख रक्कम व माल चोरीला गेला तसेच पालेखुर्द येथील टपरी फोडून माल चोरीला गेला. याला मुख्य कारण या मार्गांवर पथदिवे नसल्यामुळे अंधाराचा फायदा घेत चोरी होत असून गणेश उत्सवाच्या अगोदर या मार्गावर पथदिवे बसविण्यात यावे अशी मागणी या परिसरातील नागरिकांकडून केली जात होती.

याबाबतची बातमी दैनिक कृषिवल मधून प्रकाशित झाली होती. याचा परिणाम सत्यात उतरून एक ते दोन दिवसात या मार्गावर पथदिवे बसविण्याचे काम पूर्ण होईल. यामुळे हा मार्ग प्रकाशमय होईल व जनतेच्या अनेक अडचणी दूर होतील.

# पनवेल बाजारपेठ गौराईचे मुखवटे

## पूजेच्या साहित्याने सजली

**। पनवेल । वार्ताहर ।**

विघ्नहर्त्या गणरायाबरोबरच गौराईच्या आगमनास आता अवघे काही दिवस शिल्लक असताना गौराईचे मुखवटे व पूजेच्या साहित्याने पनवेल मधील बाजारपेठा सजल्या आहेत.

यानिमित्ताने अमरावती व सातारा वाई या भागातून विक्रीसाठी पनवेल परिसरात दाखल झालेल्या गौराईचे मुखवटे खरेदी करण्यासाठी महिलांची बाजारपेठेत गर्दी होताना दिसत आहे. गौरी गणपतीचा सण जवळ आला की गृहिणींची विविध वस्तूंच्या खरेदीसाठी लगबग सुरू होत असते. तीन दिवस चालणाऱ्या गौरीच्या सणाला मोठे महत्त्व आहे. प्रत्येक घरात भाद्रपद महिन्यामध्ये गौरीचे आगमन होते. ज्यांच्या घरात नवीन सून आली आहे ते कुटुंब गौरीसाठी लागणारे सर्व साहित्य पुन्हा नव्याने खरेदी करत असते. गौरीचे मुखवटे, गौरीचे दागिने, गौरी बसवण्यासाठीचा स्टॅण्ड या सर्व साहित्याची बाजारपेठेत जोरदार खरेदी सध्या सुरू असल्याचे दिसत आहे. शहराची मुख्य बाजारपेठ असलेल्या भाजी मार्केट परिसरासह इतर काही ठिकाणची दुकाने गौराईच्या मुखवट्यांनी सजली आहेत. अमरावती व सातारा वाई याठिकाणाहून विक्रीसाठी हे मुखवटे पनवेल परिसरात दाखल झाले असून या मुखवट्यांची किंमत सहाशे रुपयापासून ते अडीच हजार रुपयांपर्यंत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

SARASWATI EDUCATION SOCIETY'S
YADAVRAO TASGAONKAR POLYTECHNIC
Approved by AICTE & DTE, Affiliated to MSBTE, Mumbai
At. Chandhai, Post-Nasrapur, Tal: Karjat, Dist: Raigad, Pin code: 410201
www.ytpolytechnic.com, principal.ytp@tasgaonkartech.com

ADMISSION NOTIFICATION Against Cap Vacancy (ACAP)

**Applications are invited for Admission to First Year Diploma in Engineering (DEN) Against Cap Vacancy (ACP) for various courses for academic year 2024-25.**

| Sr. No | Name of Course | Course Code | Vacant Seats |
|---|---|---|---|
| 1 | Civil Engineering | 328219110 | 43 |
| 2 | Computer Engineering | 328224510 | 34 |
| 3 | Electrical Engineering | 328229310 | 16 |
| 4 | Information Technology | 328224610 | 17 |
| 5 | Mechanical Engineering | 328261210 | 36 |

The schedule of admission procedure is as follows,
1) Sale of Information Brochure and application form at Office: **09.00 am to 4.00 pm from 05th of September 2024 to 06th of September 2024.**
2) Submission of Completely filled application form: **10.00 am to 4.00 pm from** 05th of **September 2024 to 06th of September 2024.**
3) Display of Provisional Merit List on Notice Board and Institute Website: **03.00 pm on 07th September 2024.**
4) Sale of Admission form: **09.00 am to 03.00 pm from 08th of September 2024 to 10th September 2024.**
5) Reporting to the Institute by submitting completely filled admission form with relevant documents: **10.00 am to 05.00 pm from 08th of September 2024 to 10th September 2024.**
6) Cost of Information Brochure with Admission form: **INR 200/- only**.

For any queries contact to **8149679293 / 7030896095**

Sd/
Principal
Yadavrao Tasgaonkar Polytechnic

# तंबाखू व्यसनमुक्ती केंद्राचे उद्घाटन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर असलेल्या रायगड हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर येथे तंबाखू व्यसन मुक्ती केंद्र सुरू करण्यात आले आहे. प्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ. भूषण पाटील यांनी कर्जत, खालापूर, अंबरनाथ आणि मुरबाड तालुक्यातील व्यसनांचे त्रस्त झालेल्या व्यक्तींसाठी हे केंद्र म दतगार ठरेल असा विश्वास व्यक्त केला.

तंबाखुसारखे मादक पदार्थ यांच्यामुळे आरोग्याची हानी होते याची कल्पना असून देखील व्यसन करण्याचे काही थांबत नाही. संपूर्ण भारतात प्रत्येक ठिकाणी व्यसन मुक्ती केंद्र उभारली आहेत.तंबाखू व्यसन मुक्ती केंद्रासारखे केंद्र कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावरील रायगड हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर येथे सुरू झाले आहे.तंबाखू व्यसन मुक्ती केंद्राचे उद्घाटन मानसोपचार तज्ञ डॉ. भूषण पाटील यांचे हस्ते झाले. त्यावेळी समुपदेशक डॉ. अमोल लेले, डॉ. कीर्ती रसोटे, डॉ. आशिष बंगिंवर, वंदना प्रसाद, नर्सिंग




विभाग प्रमुख आशा पवार आदी उपस्थित होते.

डॉ. भूषण पाटील यांनी रायगड हॉस्पिटलमध्ये केंद्राचे उद्घाटन केल्यानंतर कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी रायगड हॉस्पिटलचे कायदेशीर सल्लागार ॲड. रमाकांत तरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. नितीन सिंह, डॉ. सूरज हरणाळे, डॉ. प्रशांत आठवले, डॉ अमोल सातव आदी उपस्थित होते.

## पान १ वरून

### वसंतराव ओसवाल यांचे निधन

सुधागड तालुक्यासह रायगड जिल्ह्यात आपल्या कर्तृत्वाची छाप राखली आहे. वसंतराव ओसवाल यांची राजकारणातील एक अजातशत्रू अशी राहिलेली ओळख स्मरणात राहणारी आहे.

### नुकसानभरपाईला ठेंगा

काही शेतकऱ्यांच्या शेतातील बांध फुटले, घरांची पडझड झाली. तसेच पाळीव जनावरांचादेखील मृत्यू झाला.

जिल्ह्यामध्ये झालेल्या नुकसानीची पंचनामे तलाठी, ग्रामसेवक कृषी सहाय्यक यांच्या मदतीने करण्यात आला. त्याचा अहवाल तालुका स्तरातून जिल्हा प्रशासनाकडे पाठविण्यात आला. जिल्ह्यात ५७३ गावांतील दोन हजार १९४.७२ हेक्टर भात शेतीचे नुकसान झाले. ६५० घरांची पडझड झाली. त्यात काहींच्या घरांची पुर्णतः तर काही घरांच्या भिंती कोसळून हानी झाली. त्यामुळे अनेकजण बेघर झाले. ११ पाळीव जनावरांचा मृत्यू झाला. या नुकसानीचा अहवाल जिल्हा प्रशासनाकडे पाठविण्यात आला आहे.

### उत्कृष्ट भाषण पुरस्कार प्रदान

विधान परिषदेतील महिला परंपरेला पुढे घेऊन जात आहेत. तसेच महिला उपसभापती असणे ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे, असे गौरवोद्गार राष्ट्रपती द्रौपदी मूर्मु यांनी काढले. या समारंभास राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आदी उपस्थित होते.

### त्यांच्या स्वागतासाठी आम्ही तयार आहोत

या विधानाचा समाचार घेताना ते म्हणाले, राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी वेगळे विधान केले. त्यातून ते असे ध्वनित करतात की, छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरतेची लूट केली नव्हती आणि आम्हाला चुकीचा इतिहास शिकविला गेला. ज्यांचे आयुष्य इतिहासाचे संशोधन आणि अभ्यास करण्यात गेले त्यांना याबद्दल वास्तव मांडण्याचा अधिकार आहे. जयसिंगराव पवार यांनी काल आपले मत मांडले. ते म्हणाले, एकदा नाहीतर दोनदा छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरतवर स्वारी केली होती. त्यामागे त्यांचा काय उद्देश होता, हेदेखील त्यांनी सांगितले. दुसरे असे की, इंद्रजीत सावंत या दुसऱ्या इतिहास अभ्यासकांनी या मताला दुजोरा दिला. त्यामुळे नवीन पिढीसमोर खोटा इतिहास कुणी मांडू नये. चुकीचा इतिहास मांडल्यानंतर समाजात गैरसमज निर्माण होतो. त्यामुळे इतिहासकारांनी जे मत मांडले, त्याचा आदर करणे गरजेचे आहे.

महाराष्ट्रात रोज कुठेतरी महिलांवर अत्याचार झाल्याची बातमी कानावर येते. राज्य शासन विशेषतः गृहखातं यावर सक्तीची आणि कठोर कारवाई करून एकप्रकारचा आत्मविश्वास लोकांमध्ये निर्माण करायला हवा. पण हे गृहखात्याकडून केले जात नाही, अशी टीका शरद पवार यांनी केली. बदलापूरमध्ये दोन चिमुरड्या मुलीवर अत्याचार झाला, ही संतापजनक घटना होती. याची प्रतिक्रिया सामान्य लोकांमध्ये उठणे स्वाभाविक होते. पण सरकारने सांगितले की, ही बाहेरून आलेली लोक होते. बाहेरून कशाला कोण लोक आणेल? ज्या लोकांनी आंदोलन केले, त्यांच्यावर खटले दाखल केले जात आहेत. लोकशाहीच्या चौकटीत बसून कुणी आंदोलन करत असेल तर ही चुकीची बाब नाही. पण त्यासाठी अस्वस्थ असलेल्या लोकांवर खटले दाखल करता, ही बाब निंदनीय असल्याचे शरद पवार म्हणाले.

### पनवेलमध्ये शेकापचा मेळावा

पक्ष सोडून गेले. मात्र कार्यकर्ता आजही शेकापसोबत आहे. पक्षाचे नेते माजी आ. विवेक पाटील लवकरच आपल्यासोबत कार्यरत होतील. त्यांच्या अस्तित्वामुळे पक्षाला गतवैभव प्राप्त होईल. प्रस्तावित नैना प्रकल्प, मुंबई महाऊर्जा प्रकल्प, विरार अलिबाग कॉरिडॉर प्रकल्प, पनवेल महानगरपालिकेने पूर्वलक्षी प्रभावाने लादलेला मालमत्ता कर, नियोजन शून्य अशा प्रकारचा विकास आराखडा या विरोधात महाविकास आघाडीच्या सोबतीने भविष्यात जनतेला सोबत घेऊन लढा उभारणार असल्याचे प्रतिपादन बाळाराम पाटील यांनी केले.

यावेळी माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांनीदेखील आपले मनोगत व्यक्त केले. या मेळाव्यात पंचायत समिती, गाव निहाय चिटणीसांची नियुक्ती, पुरोगामी युवक संघटना, लाल ब्रिगेड संघटना, पंचायत समिती आणि गावनिहाय महिला अध्यक्षांची नियुक्ती जाहीर करण्यात येऊन मान्यवरांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे शेकापल्या नवसंजीवनी मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

### ३ कोटींची केली उलाढाल

डोळ्यांची रचना आणि रंगकाम यामुळे पेणच्या गणपती मूर्तींना स्वत:ची खास ओळख प्राप्त झाली असून, गणपती मूर्तींना गणेशमूर्तींना भौगोलिक मानांकन मिळाले आहे. या व्यवसायात पेण तालुक्यातील महिला बचतगट उतरले आहेत.

ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत पेण तालुक्यात जिल्हा परिषद दादर गटामध्ये प्रहार महिला प्रभाग संघाची स्थापना केली असून, यामध्ये १७ ग्राम संघांचा समावेश आहे. या ग्रामसंघात ४४१ महिला बचतगट जोडलेले असून, त्यापैकी ७० बचत गटातील महिला या गणपती व्यवसायात सहभागी झाल्या आहेत. महिला बचत गटांनी सुमारे ३५ हजार गणपती मूर्ती तयार केल्या असून, यामधील १ हजार ५०० गणपती मूर्ती परदेशात पाठविण्यात आल्या आहेत. गणपती मूर्ती व्यवसायातून महिला बचत गटांनी २ कोटी ८९ लाख ५० हजार रुपयांची उलाढाल केली आहे. व्यवसायासाठी उमेद अभियान मार्फत महिला बचत गटांना फिरता निधी तसेच ग्रामसंघांना समुदाय गुंतवणूक निधी आणि बँकांमार्फत पतपुरवठा करण्यात आला असून, महिलांच्या या व्यवसायाला गती प्राप्त झाली आहे. या व्यवसायामुळे महिलांच्या हाताला काम मिळाल्यामुळे त्या अधिक सक्षम झाल्या आहेत.

### २५ सप्टेंबरपर्यंत 'जंजिरा'होणार खुला

जाऊ शकतो, अशी माहिती बजरंग येलीकर यांनी दिली.

१ सप्टेंबरपासून गेटवे ते मांडवा प्रवाशी जलवाहतूक सेवा सुरू झाली असल्याने पर्यटनाचा हंगाम सुरू झाला आहे. रो-रो सेवा सुरू झाली आहे. मुंबई ते मांडवा (अलिबाग) जलमार्ग खुला झाल्याने मुंबईकडून मुरुडकडे चारचाकी वाहने घेऊन जंजिरा जलदुर्ग पाहण्यासाठी पर्यटकांची वर्दळ वाढणार आहे. अलिबाग ते मुरूड मार्ग चांगला झाल्याने पर्यटक वाहनाने सुखद प्रवास करीत मुरूडमध्ये पोहोचत आहेत. काशीद बीचवर येणारे पर्यटक जंजीरा पाहण्यासाठी मुरुडकडे हमखास येतात असे दिसून येते. त्यामुळे पर्यटन व्यवसायात तेजी येत असते.

मुरूडचा घरगुती गणेशोत्सवदेखील प्रसिध्द आहे. त्यामुळे चाकरमानी, पर्यटक मोठ्या संख्येने येणार यात शंकाच नाही. त्यामुळे आता पावसाळ्यात बंद असणारा जंजिरा जलदुर्ग खुला होण्याची प्रतीक्षा सर्वांना लागून राहिली आहे. यंदा पासून मुरूड समुद्रकिनाऱ्याचे प्रशस्त मनमोहक सुशोभीकरण हा महत्वाचा पर्यटन बिंदू पर्यटकांना निश्‍चित खिळवून ठेवू शकेल यात शंका नाही. पुरातत्व विभागाने जंजिऱ्याची स्वछता युद्धपातळीवर करून जंजिरा पर्यटकांसाठी खुला करावा अशी मागणी सर्व थरातून केली जात आहे.

पावसाळ्यात बंद असणारा मुरूड तालुक्यातील प्रसिद्ध काशीद बीच पर्यटकांसाठी खुला करण्यात आला आहे. मुरूड बीचवर पावसाळ्यात बंदी नसते. मुरूड बिचचे सुशोभीकरण अगदी अंतिम टप्प्यात असून पर्यटकांना मुरूड बीचवर किनारा हॉटेल ते विश्रामधाम, पुढे ग्रामीण रुग्णालय ते सार्वजनिक बांधकाम कार्यालया पाठीमागे समुद्रकिनारी निवांत बसण्याची सुविधा आणि प्रशस्त सुशोभीकरण अंतर्गत मनाला भावणारे मनमोहक, सुंदर, रूप पाहायला पर्यटकांना आणि नागरिकांना मिळणार आहे. सुशोभीकरण अंतर्गत भव्य पार्किंगची सुविधादेखील उपलब्ध होणार आहे.

### असंख्य कार्यकर्ते शेकापमध्ये

अध्यक्षा संजना घाणेकर, अश्विनी म्हात्रे, अर्चना काटकर, घाणेकर बंधु , वावे पोटगे, वावे खार गावातील मुंबईकर मंडळी व शेकाप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेकापचे नेते जयंत पाटील, शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून वावे पोटगे, वावे खार वावे पोटगे, वावे खार मुंबई महिला मंडळातील असंख्य कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. तळागाळातील घटकांचा विचार करणारा, सर्वसामान्यांच्या न्याय हक्कासाठी लढा देणारा तसेच गरीबांना केंद्र बिंदू मानून काम करणारा शेतकरी कामगार पक्ष आहे. त्यामुळे शेतकरी कामगार पक्षच आपले प्रश्न सोडवू शकतो असा विश्वास निर्माण करीत असंख्य कार्यकर्ते, महिला शेकापमध्ये सामील झाले.

### एसटी संपाचा फटका

राज्याप्रमाणे वेतन मिळावे यासह अनेक मागण्यांसाठी एसटी कर्मचाऱ्यांनी संप पुकारला आहे. महाराष्ट्र एसटी संयुक्त कृती समितीच्या वतीने हा संप सुरु करण्यात आला आहे. पहिल्या दिवशी या संपाला प्रतिसाद फारसा मिळाला नाही. मात्र बुधवारपासून या संपाला प्रतिसाद मिळाल्याचे चित्र दिसून आले आहे. रायगड जिल्हयात आठ एसटी बस आगारापैकी चार आगारातील काही कर्मचारी संपात सामील झाले असून चार आगारातील कर्मचारी संपात सामील झाले नाहीत, अशी माहिती विभाग नियंत्रक कार्यालयाकडून देण्यात आली आहे. एक हजार ९९८ पैकी ३०४ कर्मचारी संपात सामील झाले आहेत. या दोन दिवसांच्या कालावधीत ६१४ फेऱ्या रद्द झाल्यात आहेत. त्यामुळे एसटीला त्याचा फटका बसला असून प्रवाशांनाही त्याचा नाहक त्रास झाला आहे. ही सेवा विस्कळीत झाली आहे. विशेष म्हणजे कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय होत असल्याचे बोलले जात आहे.

### सुधीर चेरकरच्या मागे पोलीस

आरोग्य केंद्रात पतीला उपचारासाठी महिला घेऊन आली होती. शनिवारी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास वरंडेचे माजी सरपंच सुधीर चेरकर यांनी रुग्णालयात घुसून त्या महिलेला शिवीगाळ केली. त्यानंतर तिला मारहाण करून जखमी केली. रुग्णालयात महिलेला मारहाण केल्याप्रकरणी रेवदंडा पोलिसांनी सुधीर चेरकर विरोधात गुन्हा दाखल केला. या घटनेनंतर सुधीर चेरकरने तेथून पळ काढला. गेल्या चार दिवसांपासून तो फरार आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले यांच्या मार्गदर्शनाखाली दोन पथक तयार करण्यात आले आहे. पथकामार्फत पोलीस त्याचा शोध घेत आहे. वेगवेगळ्या ठिकाणी पोलिसांचे पथक रवाना करण्यात आले आहे. मात्र अजूनपर्यंत तो पोलिसांच्या तावडीत सापडला नसल्याची माहिती समोर येत आहे.

### श्रीवर्धनमध्ये आग

खूप मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली आहे. सुदैवाने या चक्कीच्या बाहेरच्या बाजूला असलेले किराणा मालाचे दुकान वाचले आहे. श्रीवर्धन नगरपरिषदेचे अग्निशमन पथक जर वेळेवर पोहोचले नसते तर ही आग पसरून संपूर्ण इमारतीने पेट घेतला असता. त्याचबरोबर इमारतीच्या बाजूला असलेली कौलारू घरेदेखील क्षतिग्रस्त झाली असती.

दोन ते तीन तासाच्या अथक परिश्रमानंतर नगर परिषदेच्या अग्निशमन विभागाने या आगीवरती नियंत्रण मिळवले व आग पूर्णपणे विझवली. या अग्नी तांडवांमध्ये लाखो रुपयांचे नुकसान झालेले असून अनेक ग्राहकांनी दळण्यासाठी आणलेले मसाले व धान्यदेखील पूर्णपणे जळून खाक झाली आहेत. श्रीवर्धन शहरात दिवसेंदिवस झपाट्याने शहरीकरण होत आहे. शहरातील विविध भागांमध्ये अनेक मोठमोठ्या इमारती उभ्या राहत आहेत. परंतु सदर इमारतींना बांधकाम परवाना देताना, त्या ठिकाणी अग्निशमन दलाची गाडी पोहोचू शकेल का, याची पूर्णपणे पडताळणी केल्यानंतरच बांधकाम परवाना देण्यात यावा, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

### कारच्या धडकेत महिलेचा मृत्यू

मद्यपान केले होते किंवा नाही हे स्पष्ट नाही. पोलिसांनी चालकाचे रक्ताचे नमुने तपासणीसाठी पाठवले आहेत. मद्यपान केले होते किंवा नाही हे अहवाल आल्यानंतर स्पष्ट होईल. मात्र, नागरिक प्रचंड आक्रमक झाले होते. त्यांनी पोलिसांसमोरच कार चालकाला मारहाण केली आहे.

SARASWATI EDUCATION SOCIETY'S
YADAVRAO TASGAONKAR POLYTECHNIC
Approved by AICTE & DTE, Affiliated to MSBTE, Mumbai
At. Chandhai, Post-Nasrapur, Tal: Karjat, Dist: Raigad, Pin code: 410201
www.ytpolytechnic.com, principal.ytp@tasgaonkartech.com

ADMISSION NOTIFICATION Against Cap Vacancy (ACAP)

**Applications are invited for Admission to Direct Second Year Diploma in Engineering (DSD) Against Cap Vacancy (ACP) for various courses for academic year 2024-25.**

| Sr. No | Name of Course | Course Code | Vacant Seats |
|---|---|---|---|
| 1 | Civil Engineering | 328219110 | 82 |
| 2 | Computer Engineering | 328224510 | 14 |
| 3 | Mechanical Engineering | 328261210 | 14 |

The schedule of admission procedure is as follows,
1) Sale of Information Brochure and application form at Office: **09.00 am to 4.00 pm from 05th of September 2024 to 07th of September 2024.**
2) Submission of Completely filled application form: **10.00 am to 4.00 pm from** 05th of **September 2024 to 07th of September 2024.**
3) Display of Provisional Merit List on Notice Board and Institute Website: **03.00 pm on 08th September 2024.**
4) Sale of Admission form: **09.00 am to 03.00 pm from 09th of September 2024 to 13th September 2024.**
5) Reporting to the Institute by submitting completely filled admission form with relevant documents: **10.00 am to 05.00 pm from 09th of September 2024 to 13th September 2024.**
6) Cost of Information Brochure with Admission form: **INR 200/- only**.

For any queries contact to **8149679293 / 7030896095**

Sd/
Principal
Yadavrao Tasgaonkar Polytechnic

**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जिल्हा - रायगड, पनवेल ४१० २०६

ई-मेल : panvelcorporation@gmail.com
pmc.townplanning@gmail.com
दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२
वेबसाईट - panvelcorporation.com

जा.क्र./पमपा/नरवि/पनवेल/ताबा पावती/२१-२४/१७०६९/२११२/२०२४, दि. ०२/०९/२०२४

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे ८८ नुसार**

विषय :- मौजे-पनवेल येथील अंतिम भूखंड क्र. ४३५ चा ताबा मिळणेबाबत.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे पनवेल येथील नगररचना योजना क्र. १ (प्रथम फेरफार) (अंतिम) नुसार अंतिम भूखंड क्र. ४३५ चा ताबा बी फॉर्म नुसार मिळणेकामी याकुब बेग ट्रस्ट तर्फ चिफ ट्रस्टी श्री. मुजफ्फर मुस्तफा बेग यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे. तरी, सदर भूखंडाचा अतिक्रमण विरहित ताबा याकुब बेग ट्रस्ट तर्फ चिफ ट्रस्टी श्री. मुजफ्फर मुस्तफा बेग यांना खालील शर्तीच्या अधिन राहून देणे प्रस्तावित आहे.

१. अंतिम भूखंड क्रमांक ४३५ ची तात्काळ अद्यावत मोजणी करून घेण्यात यावी व अद्ययावत मोजणी नकाशा या कार्यालयास सादर करावा.
२. मंजूर नगररचना योजनेनुसार दर्शविण्यात आलेले contrubution अधिक व्याज संबंधितांनी महानगरपालिकेकडे भरणा करणे आवश्यक राहील.
३. अर्जदार यांना ताबा देण्यापुर्वी त्यांच्या ताबेकब्जातील (मुळ भूखंडातील परंतु सध्या इतर अंतिम भूखंडात समाविष्ट झालेल्या) जमिनीचा ताबा महानगरपालिकेडे देणे आवश्यक आहे.
४. नगररचना अभिलेखानुसार अंतिम भूखंड क्र. ४३५ चा ताबा हा संयुक्तरित्या हस्तांतरीत करण्यात येईल.
५. सदरबाबत कोणताही वाद उपस्थित झाल्यास पनवेल महानगरपालिकेचा अंतिम निर्णय राहील.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे ८८ अन्वये अं.भू.क्र. ४३५ वहिवाटदार म्हणून आपणांस अधिकार प्राप्त असून त्याप्रमाणे आपणांस सदर खुल्या भूखंडाचा ताबा देण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावित अंतिम भूखंडावर नव्याने अनधिकृत बांधकामे होणार नाहीत याची सर्वस्वी जबाबदारी आपली असेल त्यास पनवेल महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. सदर भूखंडाबाबत ताबा पावती देणेकामी ३० दिवसाच्या आत सुचना/हरकती प्राप्त न झाल्यास आपणांस ताबा पावती देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

सही/-
**(ज्योती कवाडे)**
उपसंचालक नगररचना,
पनवेल महानगरपालिका

प्रत :-
१. मोमिनपाडा मस्जिद
(pt) श्रीम. सिताबाई गंगाराम म्हात्रे.
२. श्री. खंडु नागु म्हात्रे, मौजे- पनवेल.
३. श्री. राघो कानु म्हात्रे, मौजे- पनवेल.
४. श्री. वश्या कानु बहिरा, मौजे- पनवेल.
५. श्री. शंकर देहु बहिरा, मौजे- पनवेल.
६. श्री. गणु रामुजी बहिरा, मौजे- पनवेल.
७. श्री. जनार्दन बाबु बहिरा अ.पा.क. नीता बाबु बहिरा, मौजे - पनवेल.
८. श्री. पांडुरंग हरि भगत, मौजे- पनवेल.
९. श्री. रामजी कानु बहिरा, मौजे - पनवेल.
१०. श्री. नामु पदु बहिरा, मौजे - पनवेल.

प्रस्तुत प्रकरणी (अनु क्र. १ ते १०) आपले काही म्हणणे असल्यास ३० दिवसांत सादर करावे. विहित मुदतीत काही म्हणणे न आल्यास, प्रस्तुत प्रकरणी भूखंडाचा ताबा देण्याची कार्यवाही एकतर्फी करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

सही/-
**(ज्योती कवाडे)**
उपसंचालक नगररचना,
पनवेल महानगरपालिका

# दिवेआगारात सुपारी संशोधन केंद्र

**। दिघी । प्रतिनिधी ।**

**श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगरात निसर्गाची जोड व उत्पादनाला लागणारे पोषक वातावरण मिळणारे महाराष्ट्र राज्यातील सुपारी संशोधन केंद्र रायगडमधील होत आहे. या सुपारी केंद्राला एकूण २० कोटी निधीची मंजुरी प्रशासनाकडून मिळाल्याने केंद्र विस्तारीकरण झाल्यानंतर स्थानिक शेतकरी व बागायतदारांना उत्पन्नवाढीबरोबरच उद्योगासाठी अत्याधुनिक सोयी-सुविधा मिळणार आहेत. दिवेआगरच्या पर्यटन व्यवसायालाही यामुळे चालना मिळणार आहे.**

- **प्रशासनाकडून केंद्राला २० कोटी निधी मंजुर**
- **पर्यटन व्यवसायालाही चालना मिळणार**




कोकण कृषी विद्यापीठ दापोली अंतर्गत असणारे सुपारी संशोधन केंद्र श्रीवर्धन शहरातील ४३ गुंठे जमिनीवर पसरले असून, या केंद्राची स्थापना जून १९५३ साली झाली आहे. तालुक्यातील अनेक शेतकरी या केंद्राला भेट देत असतात. मात्र, अपुऱ्या जागेमुळे येथील सुपारी व त्यातील आंतरपिके संशोधनाला वाव मिळत नव्हता. विशेष म्हणजे, सन २००३ पासून जागेचा शोध सुरु होता.

श्रीवर्धन येथील केंद्रासाठी विस्तारित सुपारी संशोधन केंद्रासाठी दिवेआगर येथील जागा प्रस्तावित होती. मात्र, जागेबाबत स्थानिक वाद असल्याने तेथे संशोधन केंद्र बनवण्याबाबत साशंकता निर्माण झाली. मागील दिवसात ही समस्या सुटल्याने दिवेआगर येथे दोन हेक्टर जागेवर केंद्राला उभारणी करण्यात येणार मार्ग मोकळा झाला आहे. सुरुवातीला ५ कोटी ६४ लाख, तर आता १४ कोटी ७१ लाख असा २० कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. आता दिवेआगर परिसराचे हवामान आणि जमीन विचारात घेऊन अधिक उत्पादन व आर्थिक नफा मिळवून देणाऱ्या पिकाची आंतरपीक पद्धती विकसित करण्यासाठी संशोधन कार्य केले जाणार आहे.

> **दिवेआगर येथील केंद्राला शासनाकडून प्राप्त निधीनुसार येथे पाण्याची सुविधा मिळून लागवड व नर्सरी करण्यात येईल. या सर्व मूलभूत सुविधा मिळून केंद्र लवकरच कार्यान्वित होईल.**
> **- डॉ. एस.एन. सावंत, प्रभारी अधिकारी, सुपारी संशोधन केंद्र**

### श्रीवर्धनलाच हे सुपारी केंद्र का?

समुद्र किनारपट्टी भागात सुपारी हे पीक मोठ्या प्रमाणात घेण्यात येते. या भागातील स्थानिक सुपारी जातींमधून 'श्रीवर्धनी रोटा' ही जात १९९८ मध्ये केंद्राकडून विकसित केली गेली. तिच्यात पांढऱ्या गऱ्याचे प्रमाण अधिक असून मऊ असते. संशोधनास पोषक वातावरण व सुपीक जमीन यांमुळे संशोधन केंद्र श्रीवर्धन येथे १९५३ साली स्थापन केले गेले. सुपारी पिकांवरील विविध रोग, कोकणातील बागांचे सर्वेक्षण करून विविध जातींचा संग्रह व अभ्यास करणे, अधिक उत्पन्न देणाऱ्या जातींचा अभ्यास करणे तसेच रोपे शेतकऱ्यांना पुरवणे ही प्रमुख उद्दिष्ट आहेत.

### वैशिष्ट्यपूर्ण पीक

नारळ, सुपारी ही महत्त्वाची पिके असून त्यावर संशोधन केले जाते. याशिवाय जायफळ, दालचिन व काळीमिरी तसेच अननस, हळद, आले आणि सुरण यांसारखी आंतरपिके यांवर प्रयोग केले जातात. येथे सुपारीचे रोपटे, नारळाची रोपे यांची विक्री शासकीय दराने होते. श्रीवर्धनी प्रकारच्या सुपारीला मोठ्या प्रमाणात मागणी आहे.

## गॅस शवदाहिनीचे पालिकेकडे हस्तांतरण



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पालिका हद्दीतील कळंबोली-रोडपाली वसाहती मधील स्मशान भूमीत गॅसशवदाहिणीचे काम सुरु करण्यात आले आहे. सिडकोच्या माध्यमातून सुरु असलेल्या या कामासाठी जवळपास ८० लाख रुपये खर्च करण्यात येणार असून, दीपावली पर्यंत हे काम पूर्ण केले जाणार असल्याची माहिती सिडकोचे अधिकारी श्रीकांत मते यांनी दिली आहे.

मते यांनी दिलेल्या माहितीनुसार, काम पूर्ण होताच शवदाहिणीचे हस्तांतरण पालिकेकडे करण्यात येणार आहे. सिडकोच्या माध्यमातून वसवण्यात आलेल्या कळंबोली-रोडपाली वसाहतीची लोकसंख्या लाखोंच्या घरात जाऊन पोहचली आहे. वसाहतीत मृत झालेल्या व्यक्तींवर अंतिमसंस्कार करण्यासाठी रोडपाली तलावा जवळ सिडकोने दफन भूमी तसेच स्मशानभूमी उपलब्ध करून दिली आहे.

याठिकाणीलाकडावरशवदहनाचे विधी केले जात आहेत. लाकडावर केल्या जात असलेल्या दहन विधीसाठी वृक्षतोड केली जात असल्याने तसेच लाकडापासून निर्माण होणाऱ्या धुरामुळे प्रदूषण होत असल्याने सिडकोच्या माध्यमातून गॅसशववाहिनी बांधण्यात येत आहे. या ठिकाणी महानगर गॅस कंपनीच्या माध्यमातून लवकरच गॅस वाहिनीद्वारे गॅसचा पुरवठा केला जाणार आहे. गॅस वाहिन्यांचे काम पूर्ण झाल्यावर लवकरच नागरिकांच्या सेवेत गॅसशवदाहिनी उपलब्ध केली जाणार आहे.

## सिडकोकडून कारवाई

**। पनवेल । वार्ताहर ।**

सिडको मध्यमंडळाने संपादित केलेल्या तसेच संपादित करण्यात येत असलेल्या भूखंडावर मोठ्या प्रमाणात अनधिकृतपणे डेब्रीज टाकण्यात येत आहे. हे डेब्रीज मानवी आरोग्याला धोकादायक असून पर्यावरणासाठी देखील हानीकारक आहे. मंगळवारी (दि.०३) सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास एक पाच ब्रासच्या डंपर (एमएच-०३सीपी-२५२८) मधून नवी मुंबई येथील वेगवेगळ्या मोकळ्या जागेमध्ये डेब्रीज टाकण्याकरीता वाहतुक करीत असल्याचे वाशी टोलनाका येथे आढळून आला. या डंपरचे चालक मनेश श्रीराम गुप्ता (२६) व मालक जनक प्रज्ञागती (२४) या दोंघावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ग्रामसभेत पथदिव्यांचा विषय गाजला

### ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ ग्रामपंचायतीच्या तहकूब ग्रामसभेत विजेचे दिवे आणि पाण्याची वीज याबाबत मोठा गोंधळ पाहायला मिळाला. बाजारात ६०० रुपयांना मिळणारे विजेचे दिवे नेरळ ग्रामपंचायतीने १६८० रुपयांना खरेदी केले असून, हा सर्व घोटाळा माजी सदस्य सनी चंचे यांनी उघड केला असून, संबंधित ठेकेदार यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचा ठराव ग्रामसभेने घेतला आहे. तर, नेरळ गावाला नळपाणी योजनेची वीज जोडणी वीज बिल थकल्याने कापली असल्याची माहिती पुढे आली आहे.

नेरळ ग्रामपंचायतीची ग्रामसभा सरपंच उषा पारधी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सुरुवातीला मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करताना नेरळ गावातील आठवडा बाजार बंद करण्यात यावा या ठरावाला या ग्रामसभेत विरोध करण्यात आला. सर्वसामान्य यांच्यासाठी तो आठवडा बाजार आर्थिक पैसे वाचविण्यासाठी महत्त्वाचा असतो आणि यामुळे आठवडा बाजार सुरूच रहावा. तसेच, या माध्यमातून आर्थिक उत्पन्न मिळत असल्याने आठवडा बाजार सुरू ठेवला जाईल, असे यावेळी जाहीर करण्यात आले. त्यानंतर माजी सदस्य सनी चंचे यांनी ग्रामपंचायतीने लावलेले विजेचे दिवे यांना अधिक पैसे देऊन खरेदी केले आहेत, असा आरोप केला. यावर ग्रामपंचायत १६८० रुपयांना एक दिवा खरेदी करीत असून, त्यापेक्षा अधिक चांगल्या कंपनीचे दिवे हे ५००-६०० रुपये यांना मिळत आहे. त्यामुळे मुरबाड येथील ठेकेदाराला दिलेला विजेचे दिवे पुरविण्याचा ठेका रद्द करण्यात यावा, अशी मागणी सनी चचे यांनी केली. याचवेळी कागदपत्रे आणि नवीन विजेचे दिवे यांची पाहणी केल्यावर शेवटी मुरबाड येथील ठेकेदाराकडून घेतलेल्या दिव्यांची रक्कम परत घेण्यात यावी तसेच त्या ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी आणि ठराव ग्रामसभेत घेण्यात आला.

## लाडक्या बहिणींची हेळसांड

**। कोलाड । वार्ताहर ।**

राज्य सरकारने महिलांसाठी मुख्यमंत्री लाडकी योजना अंमलात आणली. या योजने अंतर्गत काही महिलांच्या खात्यात दोन महिन्याचा हप्ता जमा झाला आहे. परंतु, अजून ही कोलाड खांब परिसरातील असंख्य सर्वसाधारण लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे जमा झालेले नाही. तसेच, महाराष्ट्र बँकेत दहा बारा दिवस झाले तरी आधार कार्ड लिंक होत नाही. यासाठी बँकेत फेऱ्या मारून बहिणींची हेळसांड होताना दिसत आहे. कोलाड खांब परिसरातील महिला या अतिशय दुर्गम भागात राहणाऱ्या आहेत. या महिलांना बाजापेठेच्या ठिकाणी असलेल्या बँकेत २० ते २५ किलोमीटर अंतरावरून पायपीट करावी लागते. यातच बँकेत येऊन तासंतास रांगेत उभे राहून वाट देखील पाहावी लागत आहे.

## चिरनेर गावात विकासकामांना गती

- **अंतर्गत रस्त्यांची शोभा वाढली**



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील ऐतिहासिक चिरनेर गावातील अंतर्गत रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस भयानक होत चालली होती. मात्र, सरपंच भास्कर मोकल, उपसरपंच सचिन घबाडी तसेच पी.पी. खारपाटील कंट्रक्शन अँड कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक पांडुरंग खारपाटील, सहव्यवस्थापकीय संचालक राजेंद्र खारपाटील, गावातील कार्यकर्ते व ग्रामपंचायतीचे सदस्य या सर्वांच्या अतोनात प्रयत्नातून गावातील प्रमुख अंतर्गत रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली होती. या रहदारीच्या महत्त्वपूर्ण रस्त्यांचे काँक्रिटीकरण व मजबुतीकरणाचे काम युद्धपातळीवर करण्यात आले असून, चिरनेर गावाचे आता रूपडेच बदलून गेले आहे. यामुळे चिरनेरच्या नागरिकांबरोबर परगावातील नागरिकांनी देखील समाधान व्यक्त केले आहे.

सद्यस्थिती चिरनेर गावातील अंतर्गत रस्त्यांची अवस्था बिकट बनली होती. पायी चालण्यास व वाहतुकीस हे रस्ते धोकादायक बनले होते. मात्र, या रस्त्यांच्या दुरावस्थेच्या समस्या आजपर्यंतचे सत्ताधिकारी दूर करू शकले नाहीत. हे वास्तव आहे. दरम्यान, चिरनेर हे इतिहास प्रसिद्ध स्वातंत्र्यवीरांचे गाव आणि श्री महागणपतीचे तीर्थस्थान असताना, गावातील रस्त्यांची अवस्था शोभादायक नव्हती. मात्र, भास्कर मोकल, सचिन घबाडी आणि पी.पी. खारपाटील कंट्रक्शन अँड कंपनी, ग्रामपंचायतीचे सदस्य आणि गावकऱ्यांच्या साथीमुळे चिरनेर गावातील रस्त्यांची शोभा वाढली आहे.

दरवर्षी या अंतर्गत मुख्य रस्त्यावरून गणपती बाप्पांना मोठ्या कसरतीने प्रवासाची शर्यत पार करावी लागत होती. परंतु, यावर्षी गणपती बाप्पांचा प्रवास रस्त्यांच्या नूतनीकरणामुळे सुखकर होणार आहे. तसेच, या कामासाठी उरणचे गटविकास अधिकारी समीर वाठारकर, सहाय्यक गटविकास अधिकारी संतोषसिंग डाबेराव, ग्रिामविकास अधिकारी महेश पवार यांचेही मोलाचे सहकार्य लाभले आहे.

## 'हिट ॲण्ड रन' प्रकरणातील आरोपी मोकाट

**। उरण । वार्ताहर ।**

उरणमध्ये काही महिन्यापूर्वीच रेल्वे स्थानकाबाहेर झालेले 'हिट अँड रन' प्रकरण ताजे असताना पुन्हा एकदा असाच काही प्रकार उरण-द्रोणगिरी नोड येथे घडल्याचे समोर आले आहे. परंतु, अद्यापही या प्रकरणातील आरोपी मोकाट आहे.

द्रोणगिरी येथील देवकृपा चौक येथे शनिवार दिनांक २४ ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास एका भरधाव होंडा सिटी गाडीने ४ ते ५ जणांना उडवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या अपघातात तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.



अपघात हा एवढा भयानक होता की रस्त्यावर उभे असलेले नागरिक थोडक्यात बचावले आहेत. या अपघाताचे धडकी भरवणारे सीसीटीव्ही फुटेज समोर आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला आहे. या अपघातात एक व्यक्ती गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत. अपघातानंतर ही गाडी एका सोसायटीच्या पार्किंगमध्ये पार्क करून कव्हर टाकून ठेवली असल्याचे आढळून आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास उरण पोलिस करीत असून अद्याप कोणावरही गुन्हा दाखल नसून अपघातग्रस्त वाहनही ताब्यात घेतले नसल्याचे समजते.

याबाबत अनेक दिवस उलटूनही अद्याप गुन्हा दाखल झाला नसल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. तसेच, हा गुन्हा सर्वसामान्य जनतेच्या हातून घडला असता तर त्यावर त्वरित कारवाई झाली असती, अशी चर्चा ही सुरू आहे.

## पर्यावरणपूरक गणपती स्पर्धा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माजी सरपंच विश्वास उभारे प्रतिष्ठानतर्फे ग्रामपंचायत हद्द मर्यादित पर्यावरणपूरक घरगुती गणपती उत्सव स्पर्धेचे आयोजन दि.७ ते १२ सप्टेंबर दरम्यान करण्यात आले आहे. या स्पर्धेकरीता प्रथम क्र. रुपये ५ हजार, द्वितीय क्र. रुपये ४ हजार, तृतीय क्र. रुपये ३ हजार व चतुर्थ क्र. रुपये २ हजार तसेच, उत्तेजनार्थ १० स्पर्धकांना प्रत्येकी रुपये १ हजार रोख रक्कम, प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह दण्यात येणार आहे. स्पर्धेच्या अधिक माहितीकरिता आवाद (८२९११९६७६५), आकाश उभारे (७५०६७७७८०२), प्रकाश नाडकर (९२७२८१५१२९) यांच्याकडे संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

### नावनोंदणी करण्याचे आवाहन

## जर्मनीत रोजगाराची संधी उपलब्ध

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

**रायगड जिल्ह्यातील युवक-युवतींना जर्मनीत रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. जर्मन भाषा शिकवण्यासाठी शाळेतील शिक्षकांना संधी असून, यासाठी नावनोंदणी करण्याचे आवाहन पनवेल येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था प्राचार्य डॉ. सुभाष महाजन यांनी केले आहे.**




**जर्मन शिका, नोकरी मिळवा**

राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेले कुशल मनुष्यबळ आणि अन्य प्रगत युरोपियन देशांमध्ये त्यांची असणारी कमतरता या पार्श्वभूमीवर राज्यातील युवकांना युरोपियन देशांमध्ये नोकरी व रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. ही बाब विचारात घेऊन राज्य शासनाने जर्मन देशातील बाडेन बुटेनबर्ग या राज्याशी कुशल मनुष्यबळ प्रशिक्षित करून उपलब्ध करून देण्याबाबत सामंजस्य करार २५ फेब्रुवारीला केला आहे. तसेच, पुढील कामकाजाची दिशा ठरविण्यासाठी ११ जुलैला शासन निर्णय निर्गमित केला आहे.

जर्मन भाषा शिकण्यासाठी जिल्हास्तरावर २५ विद्यार्थ्यांसाठी एक प्रशिक्षण वर्ग याप्रमाणे १० हजार विद्यार्थ्यांसाठी ४०० प्रशिक्षण वर्गाची आवश्यकता आहे. हे प्रशिक्षण वर्ग दोन सत्रात असल्याने (सकाळ व संध्याकाळ) २०० प्रशिक्षण वर्ग सुरु करणे प्रस्तावित आहे.

जर्मन भाषा प्रशिक्षण वर्गासाठी जर्मन भाषेची अर्हता बीए इन जर्मन, एमए इन जर्मनी व ग्योथे इन्स्टिट्यूट यांच्याद्वारे घेण्यात येणारी स्तरनिहाय अ१, अ२, ब१, ब२, क१, क२ उत्तीर्ण अशी आहे. मात्र, अशा शैक्षणिक अर्हता शिक्षकांची संख्या कमी आहे. यामुळे शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमधील नियमित शिक्षकांसाठी जर्मन भाषेचे प्रशिक्षण वर्ग शासनामार्फत मोफत सुरू करणे प्रस्तावित आहे.

### पहिल्या टप्प्यात हजार जणांना संधी

जर्मनी येथे नोकरी मिळविण्यासाठी राज्यातच निवड प्रक्रिया व नोकरीच्या नियुक्तीचे वाटप, व्हिसा आणि पासपोर्टसाठी संपूर्ण मार्गदर्शन करण्यात येणार आहे. जर्मनी येथील सुरुवातीच्या काळातील मदतही राज्याची असणार आहे. पहिल्या टप्प्यात सुमारे दहा हजार युवक-युवतींना संधी उपलब्ध होणार आहे. उत्पन्नामध्ये भरघोस वाढ व अत्याधुनिक यंत्रसामुग्रीवर काम करण्याची संधी युवकांना मिळणार असल्याचेही म्हटले आहे.

### राज्य शासनाची योजना

राज्यातील कुशल-अकुशल बेरोजगार युवक-युवतींना जर्मनी येथे रोजगारासाठी अधिकृतरित्या पाठविण्यासाठीची राज्य शासनाची योजना आहे. जर्मन भाषेचे प्रशिक्षण जिल्ह्यात मोफत व जवळच देण्यात येणार आहे. आवश्यक कौशल्य सुधारण्याचे प्रशिक्षण मोफत देण्यात येणार आहे. आरोग्य सेवामधील तंत्रज्ञ, अतिथ्य सेवामधील तंत्रज्ञ, स्थापत्य सेवांमधील तंत्रज्ञ यासह अन्य सेवांमधील तंत्रज्ञ म्हणून संधी उपलब्ध होणार आहे. ११ जुलैच्या शासन निर्णयानुसार जर्मनी देशात नोकरीसाठी इच्छुक असणाऱ्या राज्यातील पात्र व कुशल युवक-युवतींनी ऑनलाईन नाव नोंदणी करावी.



# जातगणनेच्या दिशेने

चार जूनला लोकसभा निकालांचा जो भूकंप झाला त्याचे धक्के अजूनही जाणवत आहेत. एरवी माघार, माफी यातला म देखील न उच्चारणाऱ्या मोदी राजवटीने वक्फ बोर्ड, उच्च पदावरील अधिकाऱ्यांची थेट भरती इत्यादी मुद्द्यांवरून घूमजाव केले आहे. आता जातनिहाय गणनेला आपला विरोध नसल्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने म्हटले आहे. अर्थात संघाच्या प्रवक्त्यांनी हे थेटपणे सांगितलेले नाही. बरेच पण-परंतु केले आहे. सरकारी योजनांचा लाभ गरिबांना पोचवण्यासाठी आवश्यक असेल तर गणना करावी, मात्र त्याच्या आधारे राजकारण करू नये असे संघाने म्हटले आहे. संघाची राजकारणाची कल्पना अजब आहे हे सर्वांनाच ठाऊक आहे. अयोध्येतली बाबरी मशीद पाडून राममंदिर बांधायचे, त्यासाठी शेकडो दंगे झाले आणि हजारो लोक मेले तरी पर्वा करायची नाही. आपण राष्ट्र निर्माणासाठी हे सर्व करीत आहोत असा दावा करायचा. नंतर भाजपने या सगळ्यांच्या आधारे मते मागायची. त्या निवडणुकांमध्ये संघाच्या स्वयंसेवकांनी भाजपला मदत करायची. आणि तरीही संघ राजकारण करीत नाही असा दावा चालू ठेवायचा, असली भामटेगिरी सत्तर वर्षांपासून चालू आहे. त्यामुळे राजकारण करू नका वगैरे म्हणणे हा बकवास आहे. जातनिहाय जनगणनेचे आकडे आल्यानंतर नेहरू आणि काँग्रेसच्या काळात जनता किती मागास राहिली याचा हा घ्या पुरावा म्हणून भाजप थयथया नाचणारच आहे. तरीही संघ आणि भाजपवाल्यांना खरी भीती आहे ती आपल्या हिंदुत्वाच्या प्रकल्पाचे काय होणार याची. कारण, एकदा विविध जातींची संख्या आणि त्यांचा कमी-अधिक मागासपणा बाहेर आला की, त्यांची तुलना सुरू होणार आहे. प्रत्येक जातीची अस्मिता फणा वर काढणार आहे. आमच्या जातीला तमुकच्या तुलनेत काहीच मिळालेले नाही असा आक्रोश सुरू होणार आहे. सगळे हिंदू एक आहेत या संघाच्या प्रचाराचा धुव्वा उडणार आहे. असंख्य जातींच्या संघटना व त्यांच्या मागण्या यांची हिंदू म्हणून सांधेजोड करणे अशक्य होणार आहे.

### संघाची वातावरण निर्मिती

मात्र आता जनतेचा रेटा इतका वाढला आहे की जातगणना करावीच लागणार आहे. जातगणनेमधून समाजात किती भीषण विषमता आहे ही बाब समोर येण्याची शक्यता आहे. उच्च जातींची लोकसंख्या केवळ पाच-दहा टक्के असूनही सर्व संपत्ती, सरकारी नोकऱ्यांमधील उच्च जागा इत्यादी त्यांच्याच हातात असल्याचे पुन्हा एकदा लक्षात येणार आहे. यामुळे हे सर्वेक्षण लवकरात लवकर व्हावे मागास तसेच ओबीसी म्हणजेच इतर मागास जातींची इच्छा आहे. लोकसभा निवडणुकांमध्ये मोदींना त्यांच्या अपेक्षेनुसार यश मिळाले असते तर ती इच्छा कधीच पूर्ण झाली नसती. पण मागास समाज रागावल्यामुळेच हे यश मिळाले नाही हे भाजपला कळून चुकले आहे. त्यामुळे जातगणना करावी लागणार हे त्यांना दिसते आहे. संघाची घोषणा म्हणजे त्यासाठी वातावरणनिर्मिती करण्याचा प्रयत्न आहे. काँग्रेसच्या किंवा राहुल गांधींच्या मागणीला बळी पडून हे केलेले नाही असे भाजपला आता सांगता येईल. खरे तर २०१० मध्ये गोपीनाथ मुंडे व सुषमा स्वराज यांनी संसदेत जातगणनेच्या मागणीला पाठिंबा दर्शवला होता. २०११ मध्ये तशी ती अंशतः करण्यात आलीही होती. पण काही कारणांस्तव ही आकडेवारी गुप्त ठेवण्यात आली. नंतर मोदींच्या भाजपने या मागणीला विरोध केला. इतकेच काय २०२१ची नेहमीची जनगणनाही केली नाही. या देशावर तहहयात आपलीच सत्ता राहणार आहे अशी गुर्मी तेव्हा मोदींना होती. ती आता उतरली आहे. १९३१ पर्यंत या देशात ब्रिटिशांकरवी जातगणना होत होतीच. आताही आरक्षणासाठी तिचेच आकडे वापरले जातात. स्वातंत्र्यानंतरही पूर्वास्पृश्य किंवा दलित आणि आदिवासी जातींची गणना चालू आहेच. इतर मागास व इतर सामान्य जातींची मोजणी मात्र थांबली होती. ती सुरू झाली तर आरक्षणाचा प्रश्न सोडवण्यासाठी महत्वाची माहिती उपलब्ध होऊ शकेल.

### केवळ आरक्षणासाठी नव्हे

अलिकडे ओबीसीच नव्हे तर मराठा, जाट, पटेल इत्यादी जातींनीही राखीव जागांची मागणी केली आहे. ओबीसी किंवा दलित असा एक गट केला जाऊन सध्या राखीव जागा मिळतात. आता या गटांमध्ये समाविष्ट सर्वांचे जातीनिहाय वर्गीकरण करावे व आजवर कोणाला किती लाभ मिळाला आहे हे शोधावे असे सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच एका निकालात म्हटले होते. ती बाब जातनिहाय गणनेमुळे शक्य होईल. दलितांमध्ये महार, मांग, चांभार किंवा ओबीसींमध्ये माळी, वंजारी, धनगर इत्यादींचे जातीनिहाय तपशील मिळाले तर त्यांच्यातही पोट-आरक्षण देता येऊ शकेल. ते करण्याला काहींचा विरोध आहे. पण कोणावरही अन्याय होणार नाही अशा रीतीने त्याची पध्दत विकसित करणे ही काही फार अवघड बाब नाही. सामान्य जनगणनेमध्ये केवळ एक अधिकचा कॉलम समाविष्ट करून ही जातींची माहिती गोळा करता येणार आहे. त्यामुळे त्यासाठी कोणताही वेगळा खर्च किंवा अधिकचा वेळ लागणार नाही. याबाबत पसरवले जाणारे गैरसमज खोटे आहेत. हे आकडे जाहीर झाल्यावर आरंभी काही काळ विविध जातींमध्ये थोडाफार ताणतणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र सरकार निःपक्षपाती राहिले व मागासांना न्याय देण्याचे सूत्र नीट ठरवले गेले तर तो निवळू शकतो. मोदी सरकारला सवय आहे त्याप्रमाणे त्यात काहींना झुकते माप देण्याचा किंवा यादवांसारख्या काही जाती विरोधकांमागे आहेत म्हणून त्यांना चेपण्याचा प्रयत्न झाला तर मात्र मोठा भडका उडू शकतो. लोकसभेच्या निकालाने मोदींच्या भाजपला पुरेशी अक्कल आली असेल व ते या फंदात पडणार नाहीत अशी आशा करूया. १९३१ नंतर आजवर कोणत्या जातींची लोकसंख्या नेमकी किती आहे याचे केवळ अंदाज बांधून त्याआधारे आरक्षण इत्यादी फायदे दिले गेले आहेत. पण आता ही ठोस आकडेवारी हाताशी असल्याने त्या धोरणात नेमकेपणा येऊ शकेल. आरक्षण हा केवळ एक भाग झाला. एकूणच विकासाची धोरणे राबवताना सरकारला या जातगणनेचा मोठा उपयोग होईल.

विचार

# सर्व विघ्ने दूर व्हावीत...

*काही दिवसांमध्ये विघ्नहर्त्याचे आगमन होत आहे. एकीकडे त्याच्या स्वागताची तयारी सुरू असताना दुसरीकडे या उत्सवकाळात सामाजिक स्वास्थ्य सुधारण्यासाठी काय करता येईल, याचाही विचार व्हायला हवा. सध्या हा देखील सणाच्या साजरीकरणाचा एक भाग असण्याची गरज आहे. ते साधले तर नानाविध सामाजिक प्रश्नांचे तिढे वाढत असताना समाजाला एकत्रित करणाऱ्या या वातावरणाचा यशोचित परिणाम बघायला मिळेल.*



**स्वाती पेशवे**

गणेशोत्सव उंबऱ्यावर येऊन ठेपला आहे. घरोघरी उत्सवाच्या महापर्वाची सज्जता सुरू असल्यामुळे भारलेले वातावरण अनुभवायला मिळत आहे. सण आणि उत्सव साजरे करताना आपण संस्कृती, परंपरेचा प्रवाह पुढे नेत असतोच, खेरीज काळानुरुप त्यात आवश्यक ते विचारप्रवाह प्रभावी आणि परिणामकारक करण्याचे कामही आपसूकच होत असते. त्यामुळेच वरकरणी या गोष्टी सालाबादप्रमाणे येणाऱ्या, नैमित्तिक वाटत असला तरी प्रत्येक वर्षीचा सण वेगळा असतो आणि तो काही तरी नवीन वैचारिक ठेवा देऊन जात असतो. नवीन पिढीचे संस्करण हा त्यातील एक भाग आहेच, त्याचबरोबर सामाजिक प्रश्नांप्रती सार्वत्रिक समज वाढवण्याचे हे एक अतिशय प्रभावी माध्यमही आहे. हे जाणूनच लोकमान्यांनी इंग्रजी जुलूम आणि गुलामगिरीविरोधात जनमत संघटित करण्यासाठी गणेशोत्सव सार्वत्रिक केला. या प्रयत्नाने एका जनलढ्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आपण पाहिली. आज आपण स्वतंत्र आहोत. जगामध्ये एक ओळख राखून आहोत. आता तर जागतिक महासत्ता होण्याच्या दिशेने आपला प्रवास सुरू आहे. मात्र समाजभावना जाज्वल्य ठेवण्यासाठी, चुकीच्या पायंड्यांविरुद्ध आवाज उठवण्यासाठी, अयोग्य गोष्टींविरोधात एकत्रितपणे उभे राहण्यासाठी आजही सण-उत्सवांचे महत्त्व पूर्वीइतकेच आहे, हे विसरता कामा नये. सण आणि सामाजिक जाणीवा हे समिकरण प्रत्येक साजरीकरणावेळी स्मरणात रहायलाच हवे. यंदाच्या येऊ घातलेल्या गणेशोत्सव आणि अन्य सणश्रृंखलेच्या निमित्ताने हे विसरता कामा नये.

तसे पाहायला गेल्यास आज प्रत्येक दिवस सणासारखा साजरा करण्याची नवप्रथा एका वर्गामध्ये बघायला मिळते आहे. 'आहे रे' वर्गाचा प्रत्येक विकएंड या सदरात मोडू शकतो. मात्र वैयक्तिक सुखे आणि एकत्र येऊन अनुभवण्याजोगी सुखे आणि त्यातून वृद्धिंगत होणाऱ्या सामाजिक जाणीवा हे दोन पूर्णपणे भिन्न पण लक्षात घेण्याजोगे विषय आहेत. म्हणूनच यंदाच्या उत्सवाची तयारी करताना निखळ आनंद मिळवण्याबरोबर हा सामाजिक आशय आणि पदरही ध्यानी ठेवायला हवा. विशेषतः आजचे आपले पारतंत्र्य, दास्य, एकटेपण, प्रश्न, समस्या, सामंजस्य वेगवेगळ्या पातळीवर उग्र रुप धारण करत असताना, या प्रश्नांचे स्वरुप बदलत असताना परिस्थितीला तोंड फोडण्यासाठी, व्यक्त होण्यासाठी, मंथन करण्यासाठी समाज एकत्रित आणणाऱ्या या सणांसारखे दुसरे एखादे योग्य व्यासपीठ आहे, असे वाटत नाही. म्हणूनच गणेशोत्सवाच्या बदलत्या स्वरूपाचाही विचार करायला हवा. गणेशोत्सवातून कलागुणांना वाव मिळावा, नेतृत्त्वगुण जोपासले जावे हा विचार काही आजचा नाही. तो फार पूर्वीपासूनचा आहे. अलीकडे नेतृत्त्वाची संधी म्हणूनही या उत्सवाकडे पाहिले जात आहे. मात्र सध्या गणेशोत्सवामध्ये सामाजिक संस्था, संघटनांच्या सहभागाऐवजी राजकीय पक्ष, नेते आणि कार्यकर्त्यांचा सहभाग वाढत आहे. आपल्या प्रसिध्दीची, जनतेपर्यंत जाण्याची आयती संधी म्हणून या उत्सवाकडे पाहिले जात आहे. आता विधानसभा निवडणुकांच्या निमित्ताने हा उत्सव अधिक धामधुमीत साजरा करण्यावर भर दिला जाणार हेही उघड आहे. गणेशोत्सव मंडळे असोत वा नेते मंडळी असोत, दोन्हीकडेही संधी साधणे हा समान गुण दिसून येतो, तो आताही दिसेलच.

काही वर्षांपूर्वी 'एक गाव, एक गणपती' ही संकल्पना राबवण्यावर भर देण्यात आला होता. परंतु ती म्हणावी तशी अस्तित्त्वात येऊ शकली नाही. याचे प्रमुख कारण नेतृत्त्वासाठी सुरू असणारी स्पर्धा हेच आहे. आज शहरांमध्ये वाहतुकीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. जागोजागी होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक तसेच सामान्य जनता हैराण आहे. अशा परिस्थितीत रस्त्यात रहदारीला अडथळा येईल, अशा पध्दतीने उभारण्यात आलेले गणेशोत्सवाचे मंडप भर घालतात. अशा मंडपांमुळे वाहतुकीच्या कोंडीत भर पडून जनतेला काय त्रास सहन करावा लागतो याची कल्पनाच केलेली बरी. याचा विचार करता हा उत्सव रस्त्यांवर साजरा होणार नाही, यासाठी प्रयत्न गरजेचे आहे. परंतु ते करायचे कोणी आणि त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळणार का, हा ही प्रश्नच आहे. कारण या काळात कायदा आणि सुव्यवस्था मोडीत आणण्याचाच चंग अनेक कार्यकर्त्यांनी बांधल्याचे दिसते. त्यामुळे स्पीकर्सचा आवाज, मिरवणुकांच्या वेळा, कार्यक्रमांच्या वेळा याबाबतचे कोणतेही नियम किंवा त्या संदर्भातील पोलिसांच्या, न्यायालयांच्या सूचनांचा विचार केला जात नाही. अशा पध्दतीने जनतेला त्रास देऊ शकणारे विघ्न आणून विघ्नहर्त्याचा उत्सव साजरा करणे कितपत योग्य ठरते याचा विचार व्हायला हवा.गणेशोत्सव काळात वर्गणी जमा करणे काही ठिकाणी जणू खंडणी जमा करण्याचाच प्रकार ठरतो. वास्तविक, वर्गणी ऐच्छिक असावी. ती देणाऱ्याला मनापासून समाधान वाटावे; तरच त्या उत्सवाला काही अर्थ राहतो. परंतु हेही समजून कोण घेणार? कारण गणेशोत्सवात अधिकाधिक खर्च करण्याबाबतही विविध मंडळांमध्ये स्पर्धा पहायला मिळते. यंदा हेही चित्र बदलले तर बरे होईल. तसे झाल्यास जनतेचा या उत्सवातील सहभाग वाढेल आणि हा खऱ्या अर्थाने लोकोत्सव ठरेल. अलीकडे सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणेशमूर्तीही अधिकाधिक उंचीच्या, भव्य असतील यावर भर दिला जात आहे. मूर्ती अधिक उंचीची असेल तरच गणेशोत्सवाला अर्थ आहे असाच जणू समज आढळतो. परंतु अशा मूर्तीसंदर्भात अनेक प्रश्न निर्माण होतात. मिरवणुकीपासून विसर्जनापर्यंत अनेक प्रकारचा त्रास समोर येतो. त्यामुळे गणेशमूर्तींचा आकार आटोपशीर असेल याकडे सर्वच गणेश मंडळांनी लक्ष देण्याची गरज आहे.

कोणताही धार्मिक उत्सव हा त्याच भावनेने आणि श्रध्देने साजरा व्हायला हवा. परंतु गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीत दारू पिऊन नाचणाऱ्यांचा धार्मिक भावनांशी आणि श्रध्देशी काय संबंध, असा प्रश्न पडल्याशिवाय रहात नाही. त्यामुळे या उत्सवामध्ये धार्मिक भावना जोपासली जावी, तो श्रध्देने साजरा करावा, यासाठी नव्याने प्रबोधनाची आवश्यकता आहे. अर्थात या साऱ्या परिस्थितीतही काही आशेचे किरण आहेत. काही मंडळे कोणताही डामडौल न करता साधेपणाने परंतु श्रध्देने गणेशोत्सव साजरा करत आहेत. गणेशोत्सवकाळात विविध सामाजिक उपक्रमांमधून समाजाविषयीची जाणीव प्रकट होत आहे. परंतु अशी मोजकीच उदाहरणे पहायला मिळत आहेत. अशा मंडळांची संख्या वाढणे किंवा इतरांनी त्यांचे अनुकरण करण्याची खरी आवश्यकता आहे. शेवटी संपूर्ण समाज एकत्र यावा, त्यात एकसंघता रहावी यासाठी सांस्कृतिक धाग्याचा वापर करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक गणेशोत्सवाला सुरूवात झाली, याचे स्मरण आपण ठेवायला हवे.

हल्ली गणेशोत्सवामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, प्रबोधनपर व्याख्याने या बाबी अभावानेच पहायला मिळत आहेत. त्याऐवजी डॉल्बीचा वापर वाढत आहे. परंतु जोरजोरात वाजणाऱ्या आणि कानाचे पडदे दुखावू शकणाऱ्या डॉल्बीच्या गंभीर दुष्परिणामांचा विचार व्हायला हवा. खरे तर डॉल्बीऐवजी कमी आवाजातील स्पीकर, त्यावर वाजणारे सनईचे सूर तसेच भक्तीगीते वा भावगीते यातून गणेशोत्सवाचा खरा आनंद प्राप्त होणार आहे. पूर्वी गणेशोत्सवकाळात मेळे व्हायचे. त्यामध्ये वेगवेगळे कार्यक्रम होत, त्यातून उपजत कला-गुणांना वाव मिळायचा. आताही ती संधी मिळवून देणे गरजेचे आहे. मुख्य म्हणजे मोठ्या संख्येने समाज एकत्रित येत असल्याने सामाजिक स्वास्थ्य, सलोखा, बंधुता आदी हरपत चाललेली गुणवैशिष्ट्ये वाढवण्यासाठी त्याचा वापर करुन घेण्याबाबत विचार होणे गरजेचे आहे. अलिकडच्या काही घटना समाजमन ढवळून काढणाऱ्या होत्या. तो दाह अजूनही जाणवतो आहे. गौरी, गणपती, नवरात्री आदी उत्सव धुमधडाक्यात साजऱ्या करणाऱ्या या समाजातील वाढती विकृती अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त करुन टाकत आहे. त्याविरुद्धचा जागर, लढा एक-दोन दिवस मेणबत्त्या पेटवून संपणार नाही. सणांच्या निमित्ताने अशा शक्तींविरुद्ध एकवटण्याचे प्रयत्न करता येतील. थोडक्यात, हा उत्सव साऱ्यांसाठी आनंददायी आणि समाधान देणारा असावा, या दृष्टीने आता प्रयत्न होण्याची गरज प्रकर्षाने जाणवते. गणेशोत्सवाचा हाच तर खरा उद्देश आहे. लोकांनी स्वतः आनंद घ्यावा, इतरांना द्यावा, हेच विघ्नहर्त्याचेही म्हणणे असावे. तेव्हा त्याच्या उपासकांनी, भक्तांनी, साधकांनी या विचारातून यंदाच्या उत्सवात रंग भरावेत आणि आपल्यावरीलच नव्हे तर त्याच्या साक्षीने संपूर्ण समाजावर येऊ घातलेल्या विघ्नांचा नाश करावा, हे उत्तम.

आजकाल

# शेअर बाजाराचा खेळ- कोण जिंकते, कोण हरते?

**संजीव चांदोरकर**

शेअर मार्केट मध्ये सल्लागारांची धरण फुटी झाली आहे. हल्लीच्या परिभाषेत त्यांना इन्फ्लुएन्सर्स म्हणतात. जवळपास प्रत्येक कुटुंब आपापल्या परीने बचती करत असते. अगदी गरिबातील गरीब कुटुंब देखील. श्रीमंत /उच्च/ मध्यम वर्गातील कुटुंबे शेअर मार्केटमध्ये पिढ्यानपिढ्या गुंतवणुकी करत आल्या आहेत. जुगाराचा अड्डा चालवणारा, जसा आरडा ओरडा करून, जसा जास्तीत जास्त लोकांना जुगाराच्या खेळात सामील व्हायला उद्युक्त करत असतो, तसे शेअर मार्केटवाले.,.. देशातील गरीब आणि निम्न मध्यमवर्गीयांना देखील शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकी करण्यासाठी कोणत्याही थराला जात आहेत.

कोणत्याही गुंतवणुकी चे विश्लेषण करताना फक्त परतावा रिटर्न वरती एकांगी भर देणे चुकीचे आहे. त्या गुंतवणुकीतील जोखीम देखील त्याच वेळी सांगितली गेली पाहिजे.

उदाहरणार्थ इक्विटी शेअर्समधील जोखीम सर्वात जास्त असते तर पीपीएफ आणि सार्वजनिक बँकांतील मुदत ठेवीवरील जोखीम शून्य असते. त्यांना काय सांगायचे आहे? तर एखाद्याने १९८१ साली एक लाख रुपये या विविध बचतींमध्ये गुंतवले असते , आणि तो कुंभकर्ण सारखा चाळीस वर्षे झोपी गेला असता तर त्या एक लाख रुपयाचे किती रुपये झाले असते. मुद्दा असा आहे की गरीब आणि मध्यमवर्गीयांच्या बचतीचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट लिक्विडिटी मॅनेजमेंट हेच असते. दुसऱ्या शब्दात ते त्यांच्या बँकेतल्या ठेवी, खरेदी केलेले सोने पैशाची निकड तयार होईल त्या प्रमाणात त मोडत असतात.

गोल्ड लोन कंपन्यांचे उदाहरण घ्या. मुथूथ मन्नपुरम पासून ते बजाज फिन्सर पर्यंत सर्व गोल्डन कंपन्यांचा धंदा एक्सपोनेंशली वाढत आहे. एवढेच नाही तर कर्जाचे हप्ते फेडता न आल्यामुळे या गोल्ड लोन कंपन्या त्यांच्याकडे गरिबांनी गहाण ठेवलेल्या सोन्याचा लिलाव करत असतात. वर्तमानपत्रात सोन्याच्या लिलावासाठी पानभर आलेल्या त्यांच्या जाहिराती आठवण बघा. कुटुंबाकडे येत असलेले उत्पन्न आणि कुटुंबाचे खर्च यामध्ये कायमची तफावत असणाऱ्या गरीब / निम्न मध्यम वर्गीय कुटुंबांना जर असे सांगितले की काही काळानंतर तुमच्या बचती दाम दुप्पट करून देतो तर ते आपल्या सुरक्षित मुदत ठेवी मोडून देखील दाम दुप्पट होणाऱ्या योजनांमध्ये गुंतवतील. देशातील किमान अक्षर ओळख झालेल्या प्रौढ स्त्री-पुरुषांची संख्या आता आता कोठे वाढत आहे. शिकले सवरलेले मध्यमवर्गीय नागरिक देखील वित्तसाक्षर झालेले नाहीत. तर बिचाऱ्या या कोट्यावधी गरीब निम्न मध्यमवर्गीयांची वित्त साक्षरता काय पातळीची असेल. बहुसंख्य नागरिक वित्त निरक्षर असणारे आपल्या देशात अशा पद्धतीचे इन्फ्लुएन्सर्स काँग्रेस गवतासारखे वाढणे हे काही चांगले लक्षण नाही. हे क्रिमिनल आहे.

भारतातील आयपीओ मार्केटचे भजे करण्यात आले आहे. सेबीने २०२१ ते २०२३ या कालखंडातील १४४ आयपीओ, आयपीओ नंतरची लिस्टिंग आणि लिस्टिंग नंतर गुंतवणूकदारांनी केलेली विक्री यांचा एक संशोधन अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार आयपीओच्या वेळी शेअर्स विकत घेतलेल्या अर्ध्या गुंतवणूकदारांनी लिस्टिंग नंतर फक्त एका आठवड्याच्या आत शेअर्स विकून जे मिळतील ते पैसे खिशात घातले आहेत.

गुंतवणूकदारांना दोष देण्यात अर्थ नाही. फास्ट बग , म्हणजे शेयर मार्केट मध्ये लवकरात लवकर मिळतील तेथून पैसे ओरबाडून घेण्याच कल्चर तयार केले गेले आहे. यात प्रवर्तक, देशी , परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार, रिटेल गुंतवणूकदार, सटोडिये, सर्व हात धुऊन घेत आहेत.

सर्वांना नफा होणे शक्यच नाही. कोणाला तरी तोटा होत असणारच. मग ते तोटा होणारे कोण आहेत ? ४८ कोटींचा आयापिओ फक्त भारतातच येऊ शकतो. सेकंडरी मार्केट मध्ये डे ट्रेडर्स संख्या प्रचंड वाढत आहे. म्हणजे सकाळी शेअर खरेदी करून दिवसभरात विकायचा, किंवा सकाळी शॉर्ट सेलिंग करून दिवसभरात स्क्वेअर ऑफ करायचा. प्रायमरी मार्केट म्हणजे आयपीओ मध्ये दीर्घकालीन गुंतवणूक करणारे अपेक्षित होते. तिथे डे ट्रेडर्सचे जुळे भाऊ जन्माला घातले गेले आहेत. सर्व काही बाजार ठरवेल. गुंतवणूकदाराने स्वतः च्या गुंतवणुकीची काळजी स्वतः घ्यावी. पैसे बुडाले तर कोणालाच दोष देऊ नये.असे तत्त्वज्ञान आहे.

या सर्व खेळात कोण पैसे बनवते आणि कोण पैसे गमावते हे शोधून काढणे सेबीला कठीण नाही. कारण शेअर मार्केट मधील प्रत्येक रुपयाची इलेक्ट्रॉनिक फुट प्रिंट तयार होत असते. भारतीय अर्थव्यवस्थेत जर कोणत्या क्षेत्रातील व्यवहारांचा डेटा, शेवटच्या रुपयापर्यंत, अद्ययावत ऑनलाइन आणि ऑथेंटिक पद्धतीने गोळा होत असेल तर तो शेअर मार्केटचा आहे. कोणत्या ब्रोकरच्या कोणत्या टर्मिनल वरून, कोणत्या डिमॅट अकाउंट मधून, कोणत्या दिवशी, कोणत्या वेळी, कोणत्या बँक अकाउंट मध्ये पैसे गेले आले, कोणत्या गुंतवणूकदारांनी कोणत्या कंपनीचे किती शेअर किती किमतीला विकत घेतले आणि कोणत्या किमतीला विकले. सर्व काही स्टॉक मार्केट पार्टीचे पण च्या डेटाबेस मध्ये ऑनलाईन जात असते. राज्यकर्ते आणि नियामक मंडळातील अधिकारी ज्यांनी अंपायर चे काम केले पाहिजे तेच खेळात असतील तर ?

त्यांच्याबद्दल काय बोलायचे. सर्वांना सर्व माहित आहे .

## लोकसंसद

### विनम्र आवाहन

आता गणेशोत्सव तोंडावर आला आहे. गणेशोत्सवानंतर पाठोपाठ नवरात्र येईल. या सर्वच मिरवणूकांमध्ये लावली जाणारी गाणी मुळातच मोठ्या आवाजाची असतात. त्यात प्रचंड मोठ्या स्पिकर्स वर साऊंड सिस्टीम जनरेटवर चालवून या मिरवणूका जात असतात. वास्तविक एवढ्या मोठ्या क्षमतेची साऊंड सिस्टीम मोठ्या मंडपात किंवा लावली जाते. प्रचंड कानठळ्या बसवणाऱ्या आवाजात आणि एका ठिकाणी बराच वेळ वाजवत थांबून या मिरवणुका जातात. आजूबाजूला अनेक रहिवासी रहात असतात. त्यात लहान बाळं, ज्येष्ठ/अति ज्येष्ठ नागरिक यांचा समावेश असतो. या व्यतिरिक्त ज्यांना या आवाजाचा सर्वात जास्त धोरका आहे असे हार्ट पेशंट, ब्लडपेशरचे पेशंट, गरोदर महिला अशा व्यक्तींचा समावेश असतो. हे कर्णकर्कश आवाज ऐकून सर्वसाधारण माणसाच्या छातीची धडधड होते आणि हे कमी म्हणून काय त्यात ढोल पथकाचीही भर असते या सगळ्या गोष्टींमुळे आवाजाचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते व नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होतो. तरी या मिरवणुका रात्री १० पर्यंत आवरत्या घेणे हे जास्त प्रमाणात योग्य ठरेल.कोणतेही उत्सव साजरे करताना आपल्या कृत्याचा समाजाला त्रास होत नाही याचे भान ठेवायला पाहिजे. त्याचप्रमाणे पोलिस खात्यानेही याविषयी जागरूक राहिले पाहिजे.

**- ॲड. स्वाती लेले, अलिबाग**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**५ सप्टेंबर**

**१८७२:-** 'गावगाडा' या पुस्तकाचे लेखक, ग्रामीण समाजरचना व मागास जातिसंस्थेचे अभ्यासक त्रिंबक नारायण आत्रे यांचा जन्म. 'गावगाडा'त पारंपरिक बलुतेदारांसह विविध जाती-जमातींचा परिचय करुन दिला असून समाजशास्त्रीय अभ्यासाच्या दृष्टीने हे पुस्तक आजही उपयुक्त आहे. 'गुन्हेगारी जाती' हे पुस्तकही आत्रे यांनी लिहिले, तसेच 'सक्तीचे शिक्षण' हा महत्त्वाचा निबंध 'विविधज्ञानविस्तार' मध्ये लिहिला. **१८७७:-** जुन्या पंडिती वळणाचे कवी राधारमण, पूर्ण नाव कृष्णाजी पांडुरंग लिमये यांचा जन्म. पत्नीच्या राधा या नावावरुन राधारमण हे नाव धारण केले. 'समग्र राधारमण' या संग्रहात त्यांच्या कविता समाविष्ठ. याशिवाय 'ऋतु संहारा', 'फडणीस काव्य', 'मोरोपंताचा प्रभु दोह' हे खंडकाव्य. 'गजासूर वध', 'कालचक्र', 'आर्यभूमाता', 'किरातार्जुनीय', 'महाराष्ट्रवीर' आदी काव्यसंग्रह प्रसिध्द. **१८९५:-** इतिहाससंशोधक व सांस्कृतिक ठेवा ठरलेल्या अनेक उत्तम ग्रंथांचे संपादक अनंत काकबा प्रियोळकर यांचा जन्म. 'रघुनाथ पंडित विरचित दमयंती स्वयंवर', 'गोमंतकाची सरस्वती', 'डॉ. भाऊ दाजी', 'काळ आणि कर्तृत्व', 'दादोबा पांडुरंग तर्खडकरांचे चरित्र व आत्मचरित्र', 'लोकहितवादी लेखसंग्रह', 'नवनीत' आदी ग्रंथ, तसेच दुर्मिळ ख्रिस्ती-मराठी पोथ्या यांचे संपादन त्यांनी केले.मराठीत दर्जेदार ललितलेख, तसेच इंग्रजीत गोव्याचा तथ्यपूर्ण इतिहास मांडणारी पुस्तकेही त्यांनी लिहिली.**१९०४:-** लेखक, वक्ते, संशोधक आणि संत साहित्याचे अभ्यासक भालचंद्र पंढरीनाथ उर्फ बाबुरावजी बहिरट यांचा जन्म. 'संतकवी अमृतकलश', 'नाथाचा प्रसाद', 'फिलासॉफी ऑफ ज्ञानदेव','वारकरी संप्रदाय' आदी ग्रंथ प्रकाशित. **१९०७:-** शास्त्रीय ग्रंथाचे भाषांतरकार बळवंत रामचंद्र सहस्त्रबुध्दे यांचे निधन. 'फिजिकल जॉग्रफी' या ग्रंथाचा 'भुतलविद्येची मूलतत्त्वे' या भाषांतरीत ग्रंथासह, भारतीय संगीतकलेचा आढावा घेणारे 'संगीतशास्त्र' हे छोटेखानी पुस्तकह त्यांच्या नावावर आढळते. **१९२१:-** बालसाहित्यिका, लेखिका लीलावती भास्कर भागवत यांचा जन्म. लहान्यांसाठी काव्य, कथा, कादंबरी अशा स्वरुपाचे भरपूर लेखन. 'बालसाहित्य','प्रवाह आणि स्वरुप' हे त्यांचा बालसाहित्यसंबंधीचा सांगोपांग विवरण करणारा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ. याशिवाय 'स्पर्शवल्ली', 'छाया झालीसे प्रकाश', 'हुंकार', 'मानिषाद', 'बेस्ट' या कादंबऱ्या. 'पांढरा ससा' हे व्यक्तिचित्रणात्मक तर 'जे नेत्र साठविले' हे प्रवासवर्णने अशी साहित्य संपदा. **१९३१:-** कवी, नाटककार आत्माराम मोरेश्वर पाठारे यांचे निधन. विशी ओलांडायच्या आत त्यांनी 'मार्कंडेय' हे पौरोणिक नाटक लिहिले. यानंतर 'संगीत वसंत-इंदिरा', 'नीतिसंहति','भक्त नरहरी आणि संगीत संभाजी' हे नाटक त्यातील वीरश्रीयुक्त भावनांमुळे गाजले. यावर नाटकावर ब्रिटिशांनी बंदी घातली. याशिवाय 'भिल्लिणी', 'महानदी', 'मद्यपाननिषेध' ही काव्ये त्यांनी रचली. **१९४१:-** लेखिका, कथाकथनकार प्रा. वर्षा मधुकर रेगे यांचा जन्म. 'नगरी मनोरंजनाची' या एकांकिकेसह 'पुनर्जन्म', 'बेटा वरची माणसं', 'विशाल माझी सवत' या कादंबऱ्या प्रसिध्द.**१९४१:-** लेखक पत्रकार रामचंद्र गोविंद कानडे यांचे निधन. पत्रकारितेच्या कामकाजातून वेळ काढून त्यांनी 'मराठी नियतकालिकांचा इतिहास' हा ग्रंथ तसेच रवींद्रनाथ टागोर', 'गुरुवर्य विजापूरकर आणि जगदीशचंद्र बसू यांचे चरित्र लिहिले. **१९४७:-**लेखक एडविन नाथान रोहेकर यांचा जन्म. 'गुलाबबाबा युग महिमा' हे संतचरित्र, 'तव ऋणी मी तिथे नाते', 'सिगारेटच्या राखेतून', 'हिंदोळ' ह्या कादंबऱ्या अशी साहित्य संपदा. **१९४९:-**संत साहित्याचे जाणकार, लेखक हिरुडकर कृष्णा उर्फ दयारानंद सीतारामजी यांचा जन्म. ह्यांच्या प्रकाशित ग्रंथ संपदेत 'संत गीतांजली','दर्शन महिमावली', 'संत गयाभाय स्तोत्र', 'भक्ती भजनमाला', 'संत दामोदर भजनमाला', 'संत गजानन महाराज भजनमाला', 'संत टिपरीवाले महाराज' चरित्र लिलामृत आणि 'गरिबाच्या झीत देवाचा वास' हा काव्यसंग्रह अशी साहित्य संपदा. **१९५२:-** लेखक, कवी शंकर मल्लिकार्जुन झुल्ये यांचा जन्म. त्यांचा 'रानफुल' हा काव्यसंग्रह प्रसिध्द झाला आहे. **१९५६:-** मराठी साहित्यातील बालवाङ्मयाचे शिल्पकार 'खेलगडी' या मासिकाचे संपादन लेखक काशीनाथ रावजी पालवणकर यांचे निधन. 'इसापनीतीचा अनुवाद आणि नदीकाठच्या गोष्टी', 'टेकडीवरच्या गोष्टी', 'तिस्मारखां', 'सोबती', 'गच्चीवरच्या गोष्टी' आदी पुस्तके त्यांनी प्रसिध्द झाली आहेत. **१९६४:-** लेखक, ग्यानचंद ताराचंद जांभुळकर यांचा जन्म. ह्याचा 'समाजप्रबोधन गीतमाला' हा गीतसंग्रह आणि 'आदर्श फुले दांपत्य : क्रांतिसूर्य ज्योतिबा व क्रांतिमाता सावित्री' यांचे चरित्र लिहिले आहे. **१९७८:-** कवी व कलंदर कलावंत रघुनाथ रामचंद्र तथा रॉय किणीकर यांचे निधन. 'रात्र आणि उत्तररंग' हे काव्यसंग्रह. 'खजिन्याची विहिर', 'ये गं ये गं विठाबाई' ही नाटके आणि अनेक ललितलेख त्यांनी लिहिले.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

५ सप्टेंबर

१) श्री. चंद्रकांत भास्कर नाईक
वरसोली, अलिबाग, ५-९-१९४४

२) श्री. वसंत रामचंद्र नाईक
पंतनगर चेंढरे, अलिबाग, ५-९-१९५१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**दि. ३/९/२०२४**

**सौ. मयुरी निरव गडा, वाढदिवस, विद्यानगर, अलिबाग**



**दिवंगत नारायण लक्ष्मण नाईक , स्मृतीदिन, चौल बेलाई, अलिबाग**

**४-९-२०२४**

**१. कै. श्रीमती शरयू पुरुषोत्तम भातखंडे, स्मरणार्थ, महाड**

**५-९-२०२४**



**कै. प्रताप दत्तात्रय गंभीर स्मरणार्थ अलिबाग**

# निलेश राणेंसह 24 जणांविरुद्ध न्यायालयात दोषारोपत्र दाखल

**। रत्नागिरी । वार्ताहर।**

**जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढल्याप्रकरणी पोलिसांनी माजी खासदार नीलेश राणे यांच्यासह २४ जणांविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. रत्नागिरी शहरालगतच्या मिरजोळे एमआयडीसी येथे गोवंश हत्येतील आरोपींच्या अटकेच्या मागणीसाठी ७ जुलैला नीलेश राणे यांच्या नेतृत्वाखाली परवानगी न घेता मोर्चा काढून रास्ता रोको केला होता.**





### पोलिसांचा आक्रमक पवित्रा

**मिरजोळे एमआयडीसी येथे गोवंश हत्येतील आरोपींच्या अटकेच्या मागणीसाठी मोर्चा काढून रास्ता रोको करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी आक्रमक भूमिका घेतली. याप्रकरणी पोलिसांनी नीलेश राणे, बाळ माने, सचिन वहाळकर, चंद्रकांत राऊळ यांसह सकल हिंदू समाज संघटनेच्या इतर २४ जणांवर गुन्हा दाखल करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.**

माजी खासदार नीलेश राणे, माजी आमदार बाळ माने, सचिन वहाळकर, चंद्रकांत राऊळ यांच्यासह इतर २४ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. जुलै महिन्यात एमआयडीसी रस्त्यावर गोवंशाचे अवशेष निदर्शनास आले होते. यानंतर रत्नागिरीत संतापाची लाट उसळली होती. रत्नागिरी ग्रामीण पोलिसांकडून संशयित आरोपींना अटक करण्यात दिरंगाई होत असल्याच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाकडून ७ जुलै २०२४ ला पोलिस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात शेकडोंचा जमाव होता. या मोर्चाचे नेतृत्व माजी खासदार नीलेश राणे यांनी केले होते. समाधानकारक उत्तर न मिळाल्याने जेलनाका येथे लोकांनी उत्स्फूर्त रास्ता रोको करत जवळपास चार तास मुख्य रस्त्यावरील वाहतूक बंद केली होती. यानंतर पोलिसांकडून कारवाई करण्यात आली होती. दरम्यान, रास्ता रोको केल्याबद्दल पोलिसांनी नीलेश राणे, बाळ माने, सचिन वहाळकर, चंद्रकांत राऊळ यांसह सकल हिंदू समाज संघटनेच्या इतर २४ जणांवर गुन्हा दाखल करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत.

# कृषी शास्त्रज्ञाचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**। मुरुड । वार्ताहर ।**

सध्या पावसाच्या प्रमाणात खंड पडत असल्यामुळे भात पिकावर खोडकिडा व पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. त्यामुळे मुरुड तालुक्यातील उसडी, वाणदे, मजगाव, म्हाळुंगे बु, वळके या गावांमध्ये प्रातिनिधीक स्वरूपात तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत रोहा येथील कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ जीवन आरेकर यांच्या क्षेत्रीय भेटीचे आयोजन नुकतेच करण्यात आले.

यावेळी प्रत्यक्ष शेतकऱ्यांचा शेतावर जावून त्यांना व लगतच्या शेतकऱ्यांना किडींचा प्रादुर्भाव कसा असतो, नुकसान कशा प्रकारे होवू शकते, किड नियंत्रणासाठी उपाययोजना काय करायला पाहिजे, याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच उपस्थित शेतकऱ्यांना किड नियंत्रणासाठी शेतामध्ये ठराविक अंतरावर पक्षी थांबे उभे करण्याविषयी मार्गदर्शन केले. सदर किडींचे प्रमाण सध्या आर्थिक नुकसान पातळीच्या खाली आहे. खोडकिडा नियंत्रणासाठी एकरी ८ कामगंध सापळे वापरावेत. एकरी एक प्रकाश सापळा लावावा. बांध स्वच्छ ठेवावेत तसेच क्विनॉलफॉस १० मिली प्रती १० लिटर पाणी किंवा कारटॅप हायड्रोक्लोराईड या किटकनाशकांची २० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यातून फवारणी करण्याचे आवाहन तालुका कृषी अधिकारी मनिषा भुजबळ यांनी केले.

तसेच क्रॉपसॅप योजनेमधून सदर किडींच्या प्रादूर्भावाबाबत नियमित ऑनलाईन सर्वेक्षण सुरु आहे. त्याप्रमाणे शेतकऱ्यांना दापोली विद्यापीठाकडून येत असलेल्या सूचना शेतकऱ्यांना देण्यात येतात. सदर भेटीच्या वेळी मंडळ कृषी अधिकारी रविंद्र सैंदाणे तसेच कृषी सहाय्यक गिरजा अंभोरे, मनोज कदम आदी उपस्थित होते.

# पुजेच्या साहित्यांनी नागोठणे बाजारपेठ फुलली

**। सुकेळी । वार्ताहर ।**



अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या आपल्या लाडक्या बाप्पांचे आगमन होण्यासाठी दोन दिवसच उरले आहेत. बाप्पांच्या स्वागतासाठी थोरा-मोठ्यांपासुन बच्चेकंपनीसह सर्वजण तयारीला लागले आहेत. गणरायाला लागणाऱ्या विविध सजावटीच्या व पुजेसाठी लागणाऱ्या वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारात मोठ्या प्रमाणात गर्दी केलेली दिसुन येत आहे.

नागोठणे बाजारपेठेत देखिल आकर्षक विद्युतमाळा, फुलांच्या माळांनी बाजारपेठेत दुकाने सजली आहेत. गणेशोत्सवानिमित्त घरोघरी गणपती बाप्पांची मूर्ती आवर्जून बसवली जाते. त्यासाठी आकर्षक सजावट केली जाते. सजावटीसाठी लागणारे कापडाची झालर, विविध आकाराची फुले, माळा, लाईटचे तोरण, गळ्यातील हार, मखर, पुजेचे व प्रसादाचे साहित्य आदि साहित्य विक्रीसाठी बाजारात आले आहेत. गोकुळाष्टमीपासुन पुजेच्या साहित्यांची खरेदीला सुरुवात झाली आहे. पुजेच्या वस्तु आणि साहित्यात थोड्याफार प्रमाणात भाव वाढ सुद्धा झाली आहे. मात्र, याचा परिणाम खरेदीवर होणार नाही. तसेच यावर्षी ग्राहकांची संख्या वाढली आहे. व्यावसायीक चांगलेच खुश आहेत.

# गणेशोत्सवात अवजड वाहतूक बंद करा

**। नवी मुंबई । वार्ताहर ।**

### ■ एआयएमआयएमची मागणी

मुंबई गोवा महामार्गावरील वाहतुकीला खोळंबा नको म्हणून गेली अनेक वर्षे गणेशोत्सवादरम्यान अवजड वाहतूक बंद करण्यात येत होती. मात्र, यावर्षी गणेशोत्सव दोन दिवसांवर येवून ठेपला असतानाही अवजड वाहतूक सुरूच आहे. यामुळे वाहतूक कोंडीचा त्रास प्रवाशांसह चाकरमान्यांना होत असल्यामुळे मुंबई गोवा महामार्गावरील अवजड वाहतूक तत्काळ बंद करण्याची मागणी एआयएमआयएमचे कोकण विभाग प्रभारी तथा विद्यार्थी आघाडीचे महाराष्ट्र महासचिव हाजी शाहनवाज खान यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. तसेच या मागणीची प्रत राज्याचे उपमुख्यमंत्री, महामार्ग पोलिस आयुक्त आणि रायगड पोलीस अधीक्षकांना देखील पाठविण्यात आल्या आहेत.

४ सप्टेंबर २०२४ रोजी नागोठणे ते कोलाड रस्त्यावरील खिंडीमध्ये अवजड वाहन बंद पडल्याने दीड किमी अंतरापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या. गणेशोत्सव अवघ्या दोन दिवसांवर येवून ठेपला आहे. त्यातच कोकणात जाण्यासाठी चाकरमान्यांना नाहक त्रास होत आहे. प्रति वर्षी गणेशोत्सव काळात मुंबई गोवा महामार्गावरील अवजड वाहतूक बंद करण्यात येत असते, मात्र मुंबई गोवा महामार्गाच्या मुख्यमंत्र्यांच्या पाहणी दौऱ्यामुळे अवजड वाहतूक बंद करणे राज्य सरकार विसरले आणि याचाच फटका प्रवासी वर्गाला बसत आहे.

मुंबई गोवा महामार्ग पूर्णत्वास येण्याची चिन्हे अद्यापही धूसरच आहेत. माणगाव येथील बायपास सुरू न केल्यामुळे वाहनांच्या ३ किलोमिटर पर्यंतच्या रांगा लागल्याने कोकणातील जनतेला याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच मुख्यमंत्री यांनी दिलेल्या आदेशानुसार मुंबई गोवा महामार्गाचे काम ३ सप्टेंबरपर्यंत पूर्ण होऊ शकले नाही. पर्यायाने काही ठिकाणी एका लेनवरून दुतर्फा वाहतूक सुरू करण्यात आल्यामुळे वाहतूक कोंडीचा सामना सर्वसामान्य प्रवाशांसह कोकणकरांना होत आहे.

त्यामुळे गणेशोत्सव काळापर्यंत मुंबई गोवा महामार्गावरील अवजड वाहतूक तत्काळ बंद करण्याचे आदेश द्यावे अशी मागणी केली आहे.

# कळंबोलीमध्ये विघ्नहर्त्या पुढे खड्ड्याचे विघ्न

### रस्त्यांची चाळण

**। पनवेल । वार्ताहर ।**



गणरायाचे आगमन दोन दिवसांवर येऊन ठेपले आहे. बाप्पाच्या स्वागतासाठी गणेश भक्तांची लगबग सुरु आहे. मात्र, कळंबोली वसाहतीमधील रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यामुळे विघ्नहर्त्या पुढेच खड्ड्याचे विघ्न निर्माण झाले असून, यंदा वसाहतीमधील बाप्पाचं आगमन खड्डेमय रस्त्यावरून होणार आहे.

कळंबोली वसाहतीमधील प्रमुख रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाचे काम पालिकेच्या माध्यमातून हाती घेण्यात आले आहे. त्याचसोबत सांडपाणी वाहिन्यांचे कामदेखील सुरु करण्यात आले आहे. पावसाळ्या पूर्वी सुरु करण्यात आलेले हे काम गणेशोत्सवापूर्वी पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, अद्यापही हे काम पूर्ण झालेलेनाही. या कामा मुळे वसाहतीमधील प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आले आहेत. बंद ठेवण्यात आलेल्या या रस्त्यामुळे एकाच मार्गांवरून वाहनांची वाहतूक होत असल्याने एकेरी मार्गांवर वाहतुकीचा ताण पडून रस्त्यांची चाळण झाली आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर काही दिवसांपूर्वी या मार्गावरील खड्डे बुजविण्याचा सोपस्कार पूर्ण करण्यात आला; परंतु अवघ्या काही तासांत या कामाचे पितळ उघडे पडले. कळंबोली वसाहतीत सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाच्या माध्यमातून मोठ्या उंचीच्या गणेश मूर्तिची स्थापना करण्यात येत असते. रस्त्यांच्या झालेल्या दुरावस्थे मुळे काही ठिकाणी एकच मार्गीक उपलब्ध असल्याने विसर्जना दिवशी वाहतूक नियंत्रण करणारे पोलीस आणि गणेश भक्त यांची मोठी तारांबळ उडण्याची शक्यता आहे.

मागील काही वर्षांत आकर्षक व मोठ्या गणेशमूर्तींवर मंडळांनी भर दिला आहे. काही गणेशोत्सवाला ३० ते ४० वर्षांची परंपरा आहे. त्यामुळे गणेश चतुर्थीअगोदर थाटामाटात श्रींची मूर्ती आणली जाते. यावर्षी रस्त्यावरील खड्ड्यांमुळे गणेशमूर्ती आणताना मंडळांची तारांबळ उडाली. काही मंडळांच्या गणेशमूर्ती आदल्या दिवशी आणल्या जातात. खडतर रस्त्यातून मंगलमूर्ती आणण्याचे चिंताजनक आव्हान गणेश मंडळांसमोर उभे ठाकले आहे.

# पाटील घराण्यातील पिठोरीला शंभर वर्षांहून अधिकची परंपरा

**। कर्जत । वार्ताहर ।**

नगर परिषद हद्दीत विठ्ठल नगर परिसरात १०० वर्षाहून अधिक वर्ष परंपरा पाटील घराण्याच्या पिठोरीला आहे. सायंकाळ नंतर, या ठिकाणी भाविक दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी करत असतात.

गजानन भिवाजी पाटील नंतर शांताराम गजानन पाटील आणि तिसरी पिढी असलेले अरुण शांताराम पाटील यांच्या निवासस्थानी पिठोरी मातेची स्थापना केली जाते. श्रावण अमावास्येच्या दिवशी पूजा करण्याची परंपरा आहे. दिवे लागणीच्या वेळी सायंकाळच्या सुमारास कुमारीका कलशात किंवा सुपात तेरडे घेऊन येतात. दारात आल्यानंतर सवाशीण तिची पूजा करून पिठोरी घरात येते. त्यानंतर घरातील महिला पिठोरी सजविण्यात मग्न होतात.

परिसरातील महिला दुपारच्या वेळी पाटील कुटुंबीयांच्या घरी जमा होतात. प्रसाद म्हणून भोजनाच्या तयारीला लागतात अनेक पदार्थ मातेच्या प्रसादासाठी तयार केले जातात. त्यानंतर भाविक दर्शनाला येतात ते महाप्रसादाचा अस्वाद घेऊन जातात. त्यानंतर रात्री मातेचे विसर्जन करण्यात येते.

# रेवदंडा गोळा स्टॉपवरील खड्डा अपघाताला आमंत्रण

**। कोर्लई । वार्ताहर ।**

### ■ संबंधित बांधकाम खात्याचे दुर्लक्ष

मुरुड -अलिबाग रस्त्यावर रेवदंडा गोळा स्टॉपवरील गेल्या अनेक दिवसांपासून पडलेला खड्डा अपघाताला आमंत्रण देत आहे. दुचाकीस्वारांना यामुळे अपघाताला सामोरे जावे लागत असून याकडे संबंधित ग्रामपंचायत व सार्वजनिक बांधकाम खात्याच्या असलेल्या दुर्लक्षाबाबत वाहनचालकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

या रस्त्यावर मुरुड व अलिबाग तसेच गोळा स्टॉपवरुन समुद्र किनारी ये-जा करण्यात रेलचेल असते. या ठिकाणी असलेला खड्डा पावसाचे पाणी भरल्यावर अंदाज येत नसल्याने अनेक दुचाकीस्वारांना अपघाताला सामोरे जावे लागले असून वेळप्रसंगी या ठिकाणी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच ग्रामपंचायतीने यात लक्ष पुरवून योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी वाहनचालकांकडून जोर धरीत आहे.



# मुरुड शहरात गणेशोत्सव काळात दोनदा पाणीपुरवठा करावा

**। मुरुड । वार्ताहर ।**

कोकणातील महत्वाचा सण अर्थात गणेशोत्सव. चाकरमानी सह कुटुंब सहपरिवार लाडक्या बाप्पाच्या आगमनापासून गणेश चतुर्थीपर्यंत मूळ गावी येऊन आनंदाने उत्सव साजरा करतात. परिणामी सद्यः स्थितीत मुरुड नगरपरिषदेकडून केला जाणारा पाणीपुरवठा अपुरा पडू लागला आहे. त्यातून गावी आलेल्या कुटुंबातील व्यक्तिंची संख्या वाढल्यामुळे होणारा पाणी पुरवठा कमी पडून नागरिकांची गैरसोय होऊ नये. या करिता पाणीपुरवठा खात्याने ६ ते १७ सप्टेंबर २०२४ पर्यंत दोन वेळा मुरुड शहरात पाणीपुरवठा करावा. जेणे करून नागरिकांना सकाळ व संध्याकाळ दोन वेळा पाणी पुरवठा योग्य प्रमाणात होईल. मुख्याधिकाऱ्यांनी पाणी पुरवठा विभागाकडून योग्य नियोजन करून कार्यवाही करावी, अशी मागणी जनतेच्यावतीने माजी पाणीपुरवठा सभापती पी के आरेकर यांनी निवेदनामार्फत केली आहे.

# शासकीय अधिकारी आणि कार्यकर्ते यांच्यात समन्वय ठेवा- प्रकाश संकपाळ

**। कर्जत । वार्ताहर ।**




सण साजरे करताना शासकीय अधिकारी आणि कार्यकर्ते यांच्यात समन्वय असला पाहिजे, असे प्रतिपादन उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी शांतता कमिटीच्या बैठकीत केले.

गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद आगामी येणाऱ्या सणानिमित्त कर्जत पोलिस ठाण्याच्यावतीने शांतता समितीच्या बैठकीचे आयोज केले होते. तहसिलदार यांच्या दालनात बैठक पार पडली. बैठकीत कर्जत शहरातील विज, पाणीपुरवठा शहरातील रहदारी आदी समस्यांवर सविस्तर चर्चा झाली. यावेळी राजकीय प्रतिनिधी, व्यापारी, नागरिक आणि अधिकारी उपस्थित होते. बैठकीला उपविभागीय पोलीस अधिकारी डी. डी. टेळे, तहसीलदार धनंजय जाधव, अप्पर तहसीलदार दुर्गा देवरे, नायब तहसीलदार सचिन राऊत, गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे, पोलिस निरिक्षक सुरेंद्र गरड, माथेरान सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सोनवणे, कर्जत नगरपरीषदचे मुख्याधिकारी वैभव गारवे, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता चंद्रकांत केंद्रे आदी उपस्थित होते.

सण जवळ आले आहेत. शहरातील रहदारीची समस्या मोठी आहे, विज प्रवाह सारखा खंडित होत आहे, नगरपरिषद हद्दीत पाणी पुरवठा अनियमित होत आहे, उल्हास नदीवरील छोट्या पुलाखाली झडपा टाकल्या पाहिजेत, अनेक रस्त्यावर खड्डे पडले आहेत. या समस्यांवर सणांपूर्वी उपाय योजना करण्याची मागणी करण्यात आली.

त्यानंतर सकपाळ यांनी संबंधित यंत्रणांना तातडीने उपाययोजना करण्यास सांगितले.

### लेखी निवेदन देत परवानाच रद्द करण्याची मागणी

# धान्य न मिळाल्याने आदिवासी बांधव आक्रमक

**। रोहा । वार्ताहर ।**

**तालुक्यातील घोसाळे ग्रामपंचायत हद्दीतील मुकटे आदिवासी वाडीतील नागरीकांना गेल्या दोन महिन्याचे मोफत धान्य ठेकेदाराने दिले नाही. सदरच्या ठेकेदाराचा परवाना रद्द करण्याची मागणी आदिवासी समाजाने केली आहे. सामाजिक कार्यकर्ते शिवाजी जाधव यांच्या नेतृत्वाखाली रोहा नायब तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. ऐन सणासुदीच्या काळात ठेकेदाराने धान्य न दिल्यामुळे आदिवासी बांधव चांगलेच आक्रमक झाले होते.**



शिवाजी जाधव आदिवासी बांधवांसाठी आक्रमक होऊन थेट १२० लोकांसह न्यायासाठी तहसीलदार कार्यालयात हजर झाले. मुकटे आदिवासी वाडीत ८० ते ८५ कुटुंबांना गेले दोन महिन्याचे धान्य ठेकेदाराने दिलेले नाही. नाईलाजाने पुरवठा अधिकारी व तहसीलदार यांच्याकडे १०० ते १३० लोकांना सोबत घेत निवेदन देण्याची वेळ आल्याचे जाधव यांनी सांगितले. आदिवासी लोकांना न्याय हा मिळालाच पाहिजे. दरम्यान रेशन कार्डवर साखर दिली गेल्याची नोंद ठेकेदाराने केली. परंतु, प्रत्यक्षात साखर ही आदिवासी लोकांना मिळालीच नाही. ठेकेदार नेहमीच उद्धट भाषेत आदिवासी लोकांशी बोलत असतो. अनेक तक्रारी पुरवठा विभागात केलेल्या आहेत. मात्र, कारवाई होत नाही. त्यामुळे पुरवठा अधिकारी व ठेकेदारांचे साटेलोटे आहे का? असा संशय येऊ लागला आहे. हा ठेकेदार एका ठिकाणी धान्य ठेवत नाही. गुरांच्या वाड्यात ठेवतो, तर कधी दुसऱ्याच ठिकाणी. गेल्या सहा महिन्यांपूर्वी याच ठेकेदाराचे धान्य गुरांच्या गोठ्यात आदिवासी लोकांनी पकडले होत. कारवाई करण्याचे आदेश दिले होते. परंतु, मात्र कारवाई झाली नाही. त्यामुळेच आज ठेकेदार हा बिनधास्तपणे मुरुड व इतर ठिकाणी लोकांच्या हक्काचे धान्य विकतो, अस शिवाजी जाधव यांनी सांगितले. तक्रारीचे निवारण करण्यासाठी एक बैठक घेण्यात आली. या बैठकीत ग्रामस्थांनी मागणी केली. त्या मागणीचा पंचनामा स्वरूपात अहवाल तयार करून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात येणार आहे. ठेकेदार जर दोषी असेल तर कारवाई होणारच. तसेच ज्या कुटुंबीयांना धान्य मिळाले नाही, अशा सर्व रेशन कार्डधारकांना मी स्वतः उपस्थित राहून धान्य देईन, असे आश्वासन पुरवठा अधिकारी उज्वला अंधेरे यांनी आदिवासी लोकांना दिले.

# शुभेच्छा बॅनरवर प्रशासनाने घातली बंदी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवावेळी मोठ्या प्रमाणात गणेशोत्सवाच्या शुभेच्छांचे मोठे-मोठे बॅनर लावेल जातात. त्यामुळे वाहतूक कोंडी व अपघात होण्याची शक्यता असते तसेच काही वेळा शुभेच्छांच्या बॅनरवर वादग्रस्त राजकीय टिका-टिप्पणी करणारा, चारित्र्य हनन करणारा मजकूर लिहीलेला असतो. त्यामुळे राजकीय मतभेद होऊन शांतता भंग होऊ शकते. अशा प्रकारचे बॅनर रस्त्यावर लावण्यात येऊ नये, असे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय रायगड येथे जिल्हा शांतता समिती बैठक आयोजित करण्यात आली होती. याबैठकीत जिल्हा शांतता समिती सदस्यांनी याबाबातची मागणी केली होती. त्याला आता जिल्हाधिकाऱ्यांनी हिरवा कंदील दिला आहे.

रायगड जिल्ह्यातील (मा. पोलीस आयुक्तालय नवी मुंबई कार्यक्षेत्र वगळून) सर्व क्षेत्रामध्ये गणेशोत्सव कालावधीमध्ये शुभेच्छांचे बॅनर लावल्यामुळे वाहतूक कोंडी, अपघात व कोणत्याही प्रकारे शांतता भंग होऊ नये, म्हणून भारतीय नागरिक सुरक्षा संहिते अन्वये जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी मनाई आदेश लागू केला आहे.

निवडक

## प्रभादेवीत स्वच्छता मोहिम

**मुंबई :** प्रभादेवी शिवसेना उद्धव ठाकरे तसेच मुंबई महानगरपालिका यांच्या सहकार्याने शाखाप्रमुख संजय भगत यांनी गणेशोत्सवानिमित्त विभागातसंत गाडगे महाराज स्वच्छता दिंडीच आयोजन केले होते. या दिंडीत विभाग प्रमुख महेश सावंत, तारक राऊळ, किरण पाटील, सूर्यकांत बिर्जे, रेखा देवकर, माजी नगरसेविका ज्योती भोसले, हेमांगी वरळीकर आणि कार्यकर्ते तसेच नागरिक व प्रभादेवी मनपा शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले होते. या सर्वांच्या सहकार्यामुळे स्वच्छता दिंडी यशस्वी झाली.

## विकास कातुर्डे यांचा गौरव

**कोर्लई :** मुरुड तालुक्यातील बोर्ली-मांडला परीसरातील उद्योजक विकास मारुती कातुर्डे यांना महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. रिअल इस्टेट क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या उद्योजकांना ‘स्विफ्ट निफ्ट’ या पुणे येथील संस्थेतर्फे दरवर्षी हा पुरस्कार देण्यात येतो. ठाणे येथे झालेल्या एका कार्यक्रमात विकास कातुर्डे यांनी उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्कार-२०२४ संस्थेचे संस्थापक अध्यक्ष निलेश साब यांच्या हस्ते प्रमाणपत्र व चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

## जंगम यांना आदर्श पुरस्कार

**माणगाव :** तालुक्यातील कशेणे राजिप प्राथमिक शाळेवर उपशिक्षिका म्हणून कार्यरत असलेल्या अपूर्वा अमोल जंगम यांना या वर्षीचा राजिपच्या शिक्षण विभागामार्फत आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. यासाठी त्यांचे तालुक्यासह रायगड जिल्ह्यातून विविध स्तरांतून अभिनंदन होत असून शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबीर सेवाभावी संस्था माणगाव यांनी विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## राजाराम मोरे यांची बढती

**वावोशी :** माणगाव पंचायत समितीच्या सहाय्यक प्रशासन अधिकारी या पदावर कार्यरत असणारे राजाराम अनंत मोरे यांच्या कार्याची राजिप प्रशासनाकडून दखल घेण्यात आली आहे. त्यांना बढती देत माणगाव पंचायत समिती येथे सहाय्यक गट विकास अधिकारी पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. यामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. राजाराम मोरे २ सप्टेंबर रोजी सहाय्यक गट विकास अधिकारी या पदावर हजर झाले असून त्यांनी या पदाचा अतिरीक्त भार स्विकारला आहे.

## रमेश जाधव यांना पुरस्कार

**म्हसळा :** शिक्षक दिनाच्या निमित्ताने प्रत्येक तालुक्यातील एक जिल्हा परिषदेच्या आणि मान्यताप्राप्त माध्यमिक शिक्षकांना त्यांच्या शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्राप्त प्रस्ताव आणि मूल्यांकन समितीने केलेल्या मूल्यांकानुसार म्हसळा तालुक्यातील रा.जि.प. प्राथमिक शाळा निगडी मराठी शाळेतील शिक्षक रमेश गोविंदराव जाधव यांची आदर्श शिक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे.

# अवैधरित्या ट्रेलर पार्किंग



### अवैध धंदेही सुरु; नागरिकांत चिंता

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील पागोटे-धुतुम दरम्यानच्या राष्ट्रीय महामार्गावर दुतर्फा असलेल्या महसुली व गुरेचरण जागांवर शासकीय नियमांना बगल देत अवैधरित्या कंटेनर पार्किंग, कंटेनर यार्ड, गॅरेज, ढाबे उभारण्यात आले आहेत. शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांच्या आशिर्वादाने उभारण्यात आलेल्या या अवैध जागांवर समाजकंटकांनी अवैध धंदेही सुरू करण्यात आल्याने नागरिकांमधून चिंता व्यक्त केली जात आहे.

जेएनपीए-पळस्पे या राष्ट्रीय महामार्गावरून मोठ्या प्रमाणावर कंटेनर मालाची वाहतूक होत असते. पागोटे-धुतुम दरम्यान रस्त्याच्या कडेला असलेल्या महसुल विभागाची ४५ एकर मोकळी व गुरेचरणाची आरक्षित जागा आहेत. या जागा २०१३मध्ये महसुली विभागाने खासगी विकासकाला कोळंबी संवर्धन प्रकल्प व लागवडीसाठी भाडेतत्त्वावर दिल्या होत्या. मात्र, खासगी विकासकाने दिलेल्या जागेवर अनधिकृतपणे कंटेनर यार्ड उभारले होते. भाडेतत्वावर दिलेल्या शासकीय जागेचा वापर पुर्व परवानगी शिवाय वाणिज्य कारणासाठी सुरू करण्यात आल्यानंतर याविरोधात अनेक तक्रारी देखील झाल्या होत्या.

> जेएनपीए परिसर आणि उरण, न्हावाशेवा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अशा अवैध धंदे करणाऱ्यांवर कारवाईची मोहीम सुरुच असते.
> – एसीपी डॉ. विशाल नेहूल, न्हावाशेवा बंदर पोलिस

> महसूल विभागाच्या मालकीच्या जागेत अवैधरित्या पार्किंग, यार्ड, गॅरेज, ढाबे उभारण्यात आले असतील तर कारवाई करुन काढून टाकण्यात येतील.
> – महसूल विभाग अधिकारी

तसेच, या आरक्षित जागांवर वाहन चालकांना दमदाटी प्रसंगी शिवीगाळ, मारहाण करून जबरदस्तीने अवजड वाहने पार्किंग करण्याची सक्ती केली जाते. त्यांच्याकडून पार्किंगच्या नावाखाली पैसेही वसुल केले जातात. तर, अवैधरित्या उभारण्यात आलेले ढाबे, कॅन्टीनमधुन राजरोसपणे दारु, अंमली पदार्थाची विक्री केली जात आहे. यामुळे अशी अवैध ठिकाणे समाजकंटक आणि माफिया, गुंडांचे अड्डे बनत चालले आहेत. याकडे संबंधित शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष केले जात असल्याने काही विपरीत घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यामुळे नागरिकांमधून चिंताही व्यक्त केली जात आहे.

# पशुगणनेसाठी प्रशिक्षण



**। पाली । वार्ताहर ।**

महाराष्ट्र शासनाचा दि. ३१ ऑगस्ट रोजी कामोठे येथील सिडको समाज केंद्रामध्ये २१ वी पशुगणना प्रशिक्षण कार्यक्रम तसेच प्रगणक व पर्यवेक्षक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

हा कार्यक्रम पशुसंवर्धन विभागाचे प्रादेशिक सहआयुक्त डॉ. प्रशांत कांबळे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सचिन देशपांडे, महापालिका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. भगवान गीते, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शामराव कदम, महापालिका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. मधुलिका लाड, सहायक आयुक्त डॉ. रत्नाकर काळे, सहायक आयुक्त डॉ. अजय कांबळे, डॉ. राजेश लाळगे, डॉ. सोमनाथ भोजने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

यावेळी पशुसंवर्धन विभागाचे प्रादेशिक सहआयुक्त डॉ. प्रशांत कांबळे म्हणाले, प्रगणकांनी प्रत्येक घरी जाऊन प्रामाणिकपणे माहिती गोळा करायची आहे. ही माहिती पुढे पर्यवेक्षकांपर्यंत पोहोचवायची आहे. या गणनेतून मिळालेल्या माहितीनुसार, पशुसंवर्धन विभागाला निष्कर्ष काढून पुढील धोरणे ठरवावी लागतात. त्यामुळे ऑथेंटिक माहिती प्रगणकांनी देणे गरजेचे आहे. तर, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सचिन देशपांडे म्हणाले, पाच वर्षांतून करण्यात येणारी यावर्षीची पशुगणना सप्टेंबर महिन्यात सुरू करून डिसेंबर महिन्यापर्यंत करण्यात येणार आहे. मोबाईल ॲपच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणाऱ्या या पशुगणनेतून आपल्या राज्यात किती पशुधन आहे हे कळणार आहे. यासाठी प्रगणकांनी अचूक पशुगणना करणे अपेक्षित आहे. यावेळी डॉ. राजेश लाळगे व डॉ. सोमनाथ भोजने यांनी प्रगणक व पर्यवेक्षकांना पशुगणना करताना कोणत्या पाळीव प्राण्याची गणना करायची, कशा पद्धतीने करायची, कामाचे स्वरूप, या पशुगणनेचा उद्देश, अशा विविध घटकांची माहिती आपल्या मार्गदर्शन सत्रांमध्ये दिली. या प्रशिक्षण कार्यक्रमास सुमारे १०० प्रगणक व पर्यवेक्षक उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

शालेय शिक्षण घेत असताना विद्यार्थी शैक्षणिक साहित्यापासून वंचित राहू नये. तसेच, पालकांचा मुलांवरील शिक्षणांचा खर्च कमी व्हावा, या उदात्त विचारातून रायगड जिल्हा परिषद शाळा कारगाव येथील विद्यार्थ्यांना दप्तर तसेच शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. त्याचबरोबर तुकसई येथील ग्रामस्थांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी मोफत औषधे देण्यात आली. हे दोन्ही उपक्रम एटीजी सामजिक संस्था, बिलियन हार्ट बिट्टींग, अपोलो हॉस्पिटल यांच्या सहकार्याने डॉ. विश्वासराव गिरी, अश्विनी गिरी यांच्या माध्यमातून पार पडले.

गेली अनेक वर्षे विविध उपक्रम राबवित असताना सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम ही संस्था करीत आहे. दरम्यान, आरोग्य तपासणीला यावेळी ग्रामस्थांचा उदंड प्रतिसाद पाहावयास मिळाला.

विद्यार्थी आणि ग्रामस्थ यांना केलेल्या सहकार्यामुळे या सामजिक संस्थेचा ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले. आपण प्रत्येक वेळी सहकार्य करण्यास तयार असल्याचे डॉ. गिरी यांनी सांगितले. यावेळी अपोलोचे सहकारी, परेश सर, राजिप शाळा कारगाव मुख्याध्यापक राजेंद्र दुर्गे, तुकसई ग्रामस्थ म्हणून सुनील सर, रोहित पाटील उपस्थित होते.

# म्हसळ्यात शाडूच्या मूर्ती बनविण्याचे धडे

**। म्हसळा । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा म्हसळा येथे विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येतात. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुख्याध्यापिका सुमित्रा खेडेकर यांच्या नियोजनातून शाळेत शाडूच्या मूर्ती बनविण्याची कार्यशाळा घेण्यात आली.



- विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी कार्यशाळेचे आयोजन

दिवसेंदिवस प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती बनविण्याचे प्रमाण वाढत असून, ते पर्यावरण संतुलन बिघडविण्याचे काम करीत आहे. यामुळे प्लास्टर ऑफ पॅरिसऐवजी शाडूच्या मूर्ती पर्यावरणपूरक असल्याची जाणीव आणि जागृती या कार्यशाळेतून विद्यार्थ्यांनी समाजाला करून दिली.

गणपती उत्सव हा संपूर्ण देशात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दरम्यान, उत्सवामध्ये मूर्ती बनविण्यासाठी बहुतांश प्लास्टर ऑफ पॅरिसचा वापर केला जातो. परंतु, प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती या पाण्यात विरघळत नाहीत. मूर्ती नदी, नाले, समुद्र, विसर्जन तलाव आणि अन्य ठिकाणी पाण्यावर तरंगत राहतात. पर्यायाने मूर्तिची विटंबना होण्याची भीती असते आणि जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात होते. जलप्रदूषण कमी होण्यासाठी तसेच निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी जास्तीत जास्त गणेशभक्तांनी शाडूच्या मूर्ती वापराव्यात आणि प्रदूषण टाळण्यास सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याध्यपिका सुमित्रा खेडेकर यांनी केले आहे.

ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका सुमित्रा खेडेकर यांच्यासह शिक्षिका जयश्री गायकवाड, इंदिरा चौधरी, शिक्षक उमदी यांनी मेहनत घेतली.

# माधव आग्री यांना पीएचडी प्रदान

**। कोलाड । वार्ताहर ।**



प्रोफेसर माधव आग्री यांना ३१ ऑगस्ट रोजी अंधेरी येथील गॅलेक्सी बंक्वीट येथे मान्यवरांच्या हस्ते वॉशिंग्टन विद्यापीठ-युनाइटेड स्टेट ऑफ अमेरिका या शिक्षण क्षेत्रातील मानद डॉक्टरेट पदवी देऊन गौरविण्यात आले.

डॉ. माधव आग्री रोहा तालुक्यातील तांबडी बुद्रुक येथील रहिवासी असून, ते सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा क्षेत्रात भरीव योगदान देत असतात. याशिवाय कुणबी समाजाच्या हितासाठी अहोरात्र झटणारे एक आदर्श व्यक्तिमत्त्व आहेत. तसेच, आपल्या विभागातील गोरगरीब विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण मिळावे यासाठी अशा विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन नेहमीच शैक्षणिक मदतीचा हात देत असतात. तसेच, लायन्स क्लब कोलाड रोहाचे बोर्ड ऑफ डायरेक्टर आहेत. अशा विविध स्थरावर काम करणारे माधव आग्री सर यांना गेल्या वर्षी राज्य पातळीवरील पुरस्कार मिळाला असून, यावर्षीही त्यांच्या कार्याची दखल घेऊन वॉशिंग्टन विद्यापीठाची मानद डॉक्टरेट पदवी बहाल करण्यात आली. या यशाबद्दल माधव आग्री यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## कोकण ज्ञानपीठ कार्यशाळा संपन्न

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने युवा सामाजिक संस्था खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने व्यक्तिमत्व विकास या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. या प्राचार्य के.ए. शामा अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये श्रद्धा, नम्रता व योग्यता विकसित झाली पाहिजे असे सांगून विद्यार्थ्यांनी आपले प्रभावी व्यक्तिमत्व घडविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे, असे प्रतिपादन केले. तसेच, सरस्वती शिंदे यांनी व्यक्तीच्या क्षमता, मिळणाऱ्या संधी व संभाव्य धोके याविषयी जागरूक राहिले पाहिजे, असे प्रतिपादन केले.

# सुरक्षा अभियान बैठकीचे आयोजन



**। पेण । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील शाळा सुरक्षा अभियाना अंतर्गत शाळांच्या मुख्याध्यापकांची व प्रतिनिधींची बैठक उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा गांधी वाचनालयात संपन्न झाली.

यावेळी मुख्याध्यापक व शिक्षकांना मार्गदर्शन करताना फडतरे यांनी शासन आदेशाची आठवण करून देत शाळा सुरक्षा अभियान नक्की काय आहे, या अभियाना अंतर्गत मुख्याध्यापक व शिक्षकांनी कोणकोणत्या गोष्टींचे काटेकोर पालन करायचा आहे, या बाबींच्या सुचना देण्यात आल्या. तसेच, शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे व शिक्षकेतर कर्मचारी यांचे चारित्र पडताळून घेणे, महिला कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे, या सुचना देऊन सुरक्षतेच्या दृष्टीने सतर्क राहण्याचे सांगितले. यावेळी पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे व संदीप बागुल आदींने मार्गदर्शन केले.

या बैठकीसाठी पोलीस निरीक्षक संदिप बागुल, पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे, सहपोलीस निरीक्षक नागेश कदम, सहपोलीस निरीक्षक संतोष दराडे आदी उपस्थित होते.

# माथेरानच्या डोंगरातील रानभाज्या बाजारात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहरात जंगलातील रानभाज्या मोठ्या प्रमाणावर विक्री साठी उपलब्ध झाल्या आहेत. शहरात कारंजा येथे आणि आठवडे बाजारात आदिवासी रानभाजी खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी दिसून येत आहे.



माथेरानच्या डोंगरात अनेक आदिवासी वाड्या असून हे आदिवासी आपल्या उपजीविकेसाठी माथेरानच्या डोंगर भागात फिरून जंगली रानभाज्या विक्रीसाठी घेऊन येत असतात. श्रावण महिन्यामध्ये माथेरानच्या गर्द झाडी झुडपातील माथेरानच्या रानातील कड्यालगत उगवणारी रान भाजी, म्हणजेच गवती चहा, केळी, भाजी, शिरोळे, भेंडी, गवारी, शेपू, चिचुर्डी, टाकळ्याची भाजी, माठाची भाजी, कुरडू भाजी अशा अनेक रानभाज्या उपलब्ध होत असतात. अतिशय चविष्ट आणि रोग प्रतिकारक औषधी पालेभाज्या माथेरानच्या बाजारपेठेत आदिवासी लोक घेऊन येत असतात. सकाळच्या वेळी कारंजा येथे या रानभाज्या येत असल्याने स्थानिक नागरिक रानभाज्या खरेदी साठी गर्दी करून असतात. तर, माथेरान शहरात रविवारी आठवडा बाजार असतो.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **व्यावसायिक गाळा भाड्याने देणे आहे** कारपेट एरिया 750 Sq Foot संपर्क ९४२२५९४०३३/८३०८३२१६२६ ठिकाण - मिरची गल्ली अलिबाग.
- **ऑनलाईन प्रवेश सुरु आहे.** अंगणवाडी शिक्षिका, सुपरवाझर, समाजसेवक, पत्रकार इत्यादी कोर्स प्रवेश देणे सुरु आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा ९०२९२९४८३८/९५१८५६५५१६
- **संकुल सहकारी गृहनिर्माण संस्था,** पिंपळभाट-अलिबाग यांना सेक्युरिटीची आवश्यकता आहे. तरी इच्छुक सेक्युरिटी एजन्सीजनी कोटेशन पाठवावे. संपर्क : शरद भोईर ९०२८५७८०३०
- **विकणे आहे.** ६३५ SQ.ft चा १BHK Flat पोयनाड एस.टी. थांब्यापासून ५ मिनिटांच्या अंतरावर Contact 8425054720
- Office staff required for Office in Alibag Fresh graduates can come for interview Call 9923750549 Between 11 am to 6 pm
- **महा-ई-सेवा/आधार केंद्राकरीता** अनुभवी कॉम्प्युटर महिला ऑपरेटर पाहिजेत. इंग्रजी, मराठी टायपिंग आणि अनुभवी उमेदवारास प्राधान्य. संपर्क : श्री वरद ऑनलाईन सर्व्हिसेस. शंकर-पार्वती अपार्टमेंट समोर, शेतकरी भवन रोड, चेंढरे, अलिबाग लिव्ह अँड लायसन्स/ऑनलाईन रेंट ॲग्रीमेंट सर्व्हिस उपलब्ध. मो. ८३०८०२२६६४, (व्हाटसॲप) ७३८५६११२९१
- **कॅन्टीनसाठी अनुभवी सुपरवायजर पाहिजे.** अलिबाग येथे कॅन्टीनमध्ये राहणारा पाहिजे. संपर्क : ९२२४४४९९४१ वायोडाटा व्हाटस्अप वर पाठवणे.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### दुर्गवीर प्रतिष्ठान संस्थेकडून इतिहासाचे जतन

# रातवड येथील वीरगळांचे संवर्धन

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासामध्ये वीरगळांचे महत्व वैशिष्ट्यपूर्ण समजले जाते. वेगवेगळ्या राजवटींमध्ये सत्तासंघर्षातून बलिदान दिलेल्या वीरांचे वीरगळ महाराष्ट्रभर पाहायला मिळतात. माणगाव तालुक्यातील अनेक गावांमध्ये उत्तर कोकणचे शिलाहार घराणे आणि यादवांमधील संघर्षातील वीरांची स्मारके दृष्टीस पडतात.





रातवड हे माणगाव तालुक्यातील उत्तरेकडील शेवटचे गाव आहे. याच गावात महामार्गालगत अनेक वर्षांपासून वैविध्यपूर्ण वीरगळ उध्वस्त अवस्थेत होत्या. यावेळी माणगड, सूरगड येथे गडसंवर्धन करणाऱ्या दुर्गवीर प्रतिष्ठानच्या सदस्यांनी या वीरगळांचे संवर्धन करण्याचे ठरवले आणि दुर्गवीर प्रतिष्ठान संस्थेने रातवड ग्रामस्थांच्या संमतीने या ठिकाणी जांभा दगडांमधील चौथरा आणि त्यावर टिकाऊ असे छप्पर बनवण्यात आले.

तसेच, दुर्गवीर प्रतिष्ठान आणि सोबतीला सह्याद्रीचे शिलेदार यांची साथ मिळाली. आधी बांधलेल्या चौथऱ्यावर सर्व वीरगळ व्यवस्थित ठेवण्यात आल्या. उपस्थित दुर्गवीर, शिलेदार, शिवशंभू प्रतिष्ठानचे मावळे आणि त्याच वेळी उपस्थित असलेले महामार्ग अधिकारी यांना वीरगळांबद्दल माहिती तसेच स्मारक बांधण्याचे प्रयोजन दुर्गवीर प्रतिष्ठान सल्लागार रामजी कदम आणि राजधानीरायगड अभ्यासक मोहनराव फराडे यांनी सांगितले.

यावेळी वीरगळ संवर्धन मोहिमेत दुर्गवीर प्रतिष्ठानचे सदस्य विठ्ठल केंबळे, प्रमोद डोंगरे, महेंद्र पार्टे, किशोर सावरकर, अजित लाखाडे, सुयोग पाटील, कल्पेश सागवेकर, संकेत गोरिवले, श्रेया मालांडकर, आम्ही सह्याद्रीचे शिलेदार संस्थेचे प्रफुल्ल करकरे, सिध्दांत शिंदे, प्रतीक भोनकर रातवडचे ग्रामस्थ आणि उपसरपंच सतीश पवार, प्रणित कदम, किरण गायकर तसेच शिवशंभू प्रतिष्ठान रोहाचे प्रशांत बर्डे आणि सहकारी उपस्थित होते.

# मद्यधुंद ट्रक चालकाची पोलीस जीपला धडक



। सुकेळी । वार्ताहर ।

मुंबई-गोवा महामार्गावरील सुकेळी गावाच्या हद्दीमध्ये जिंदाल कंपनीसमोर मंगळवारी (दि.३) पहाटे दारू पिऊन असलेल्या ट्रक चालकाने नागोठणे पोलीस जीपला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात सहाय्यक पोलीस निरीक्षकांसह पोलीस जीप चालक जखमी झाले. या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

नागोठणे पोलीस स्टेशनमधून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार नागोठणे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी व जीप चालक मिलिंद महाडीक यांच्यासह पोलीस जीपने विभागात गस्ती करीता कोलाड पोलीस ठाणे येथे भेट देऊन नागोठणेकडे परत येत असताना वाटेत मुंबई-गोवा महामार्गावरील सुकेळी गावाच्या हद्दीमध्ये जिंदाल कंपनीसमोर रस्त्याच्या खाली ट्रक पलटी झालेला होता. त्या ठिकाणी कुलकर्णी यांनी आपली शासकीय जिप उभी करून मदतीकरीता रस्त्याच्या बाजूला थांबले असता; त्याच दरम्यान दारूच्या नशेत सुसाट असलेल्या ट्रक चालक सुभाष त्रिजुगी यादव याने त्याच्या ताब्यातील ट्रक नागोठणे बाजूकडून कोलाड बाजुकडे अतिवेगात व बेकायदेशीरपणे चालवून उभ्या असलेल्या शासकीय पोलीस जिपला समोरुन ड्रायव्हर बाजूला जोरदार धडक दिल्याने अपघात झाला. सदर अपघातात सहा. पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी व चालक पोलिस शिपाई मिलिंद महाडीक यांना किरकोळ स्वरुपाच्या दुखापती होऊन दोघेही जखमी झाले. त्यांच्यावर प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी पेण येथील म्हात्रे हॉस्पिटल येथे हलविण्यात आले.



# ‘मुरूड-बोर्ली स्थानकातून आरक्षण सुरू करा’

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरूड आणि बोर्ली स्थानकातून अलिबाग, मुंबई, पुणे, कल्याण आदी गाड्या या मार्गी जात असतात. परंतु या गाड्या मुरूड डेपोतुन भरून येत असल्याने बोर्ली, मांडला, काकळघर, कोर्लई या गावातील विद्यार्थी असो या लांब पल्ल्यासाठी जाणाऱ्या प्रवाशांना या ठिकाणावरुन उभे राहून प्रवास करावा लागतो.यामुळे मुरुड आगार व्यवस्थापकांनी बोर्ली स्थानाकातून आरक्षण सुरू करावे अशी मागणी मनसेचे उपजिल्हा अध्यक्ष शैलेश खोत यांनी आगार व्यवस्थापक राहुल शिंदे यांची भेट घेऊन केली.

एसटी प्रवाशांच्या समस्या बाबत चर्चा केली. यामध्ये प्रामुख्याने आगरदांडा जेट्टी वरील फेऱ्यावेळी एसटी नसल्याने येणाऱ्या प्रवाशांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. कधी कधी शाळेतील विद्यार्थ्यांना एसटीची वाट पाहत बसावे लागते. विद्यार्थ्यांसाठी फेऱ्या वेळेत असाव्यात जेणेकरून विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यास कोणतेही अडचण येणार नाही. काही दिवसात गणेशोत्सव सुरू होत आहे. या सणासुदीच्या वेळी तरी आपल्या एसटी बसेसची सुविधा योग्य असावी. जेणेकरुन गणेशभक्तांना कोणताही त्रास होणार नाही. यांची काळजी घेऊन एसटी व चालक व वाहकांची मागणी करावी. जर गणेशभक्तांना व प्रवाशांना त्रास झाला तर मनसे स्टाईलने याला चोख उत्तर दिले जाईल असा इशारा शैलेश खोत यांनी दिला.

# एक वही, एक पेन गणेशाच्या चरणी अर्पण करण्याचे आवाहन

। पनवेल । वार्ताहर ।

ओंकार मित्र मंडळाने गणेशोत्सवाच्या निमिताने अभिनव संकल्पना राबविण्यासाठी एक वही, एक पेन गणेशाच्या चरणी अर्पण करण्याचे आवाहन केले आहे.

पनवेल मधील सुप्रसिद्ध ओंकार मित्र मंडळ, पनवेल चा ओंकारेश्वर गेल्या अनेक वर्षापासून गणेश उत्सवाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करीत आहे. दरवर्षी नवीन संकल्पना राबवित ओंकार मित्र मंडळाने आपला सांस्कृतिक वारसा जपला आहे. यावर्षी ओंकार मित्र मंडळाच्या गणरायाचे दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या भाविकांनी गणरायाच्या चरणी एक वही, एक पेन अर्पण केल्यास या जमलेल्या वह्या व पेन गावातील गरीब, अनाथ आश्रमातील विद्यार्थी यांना वाटप करण्यात येतील, असे सांगितले असून भाविकांनी दर्शनासाठी येताना एक वही, एक पेन अर्पण करण्याचे आवाहन केले आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे धाकटे वेणगाव कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल यांनी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्या कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हि. नं. | क्षेत्र. हे आर चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| संकेत जनार्दन भासे<br>समिर काशिनाथ कडूसकर | २३ | ६ | ०-१५-२०<br>या पैकी<br>०-०७-६० | |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.
हे सर्वास कळावे.

ठिकाण :- कर्जत
दिनांक :- ५/०९/२०२४

ॲड. हिनल वि, ओसवाल
पत्ता - केसरिया अपार्टमेंट
ब्लॉक नं. ८ कर्जत, कर्जत रायगड
मो : ९१५८३७४२९८

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालिल वर्णन केलेली मिळकत तिचे विद्यमान मालक १) श्री. अभिजीत शशिकांत मोहिते, २) श्रीमती ज्योती प्रविण घरत, ३) श्री. बाबूलाल भेरूमल जैन, ४) श्री. मनजीत शशिकांत मोहिते, ५) श्री. रणजीत हिम्मतलाल जैन, ६) श्री. रमणिकलाल करमशी पटेल व ७) श्री. श्रीकांत जुगराज ओसवाल यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत आमचे आशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये चर्चा झालेली आहे. मिळकतींचे वर्णन की,

| गावाचे नांव | भूमापन क्रमांक व त्याचा उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| मौजे नागाव, | २१८५/२१८७/२/२२००/१/२२०१/१ | १६.३८.०० | ६३.८० |
| ता. अलिबाग, | २१८५/२१८७/२/२२००/१/२२०१/१ | २५.६९.०० | ५६.९० |
| जि. रायगड | २१८५/२१८७/२/२२००/१/२२०१/१ | ३५.७६.०० | ५७.६० |

सदर मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा, कोणत्याही संस्थेचा, बँकेचा गहाण, दान, लिज, लिन, बक्षिस, खरेदी, साठेकरार, कोणताही करार, कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, पोटगी, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, ताबा, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध, दिवाणीदावा, महसुलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकतीसह व कागदोपत्री प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत प्रत्यक्ष येवुन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वर नमुद मिळकती पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबत भरवसा विद्यमान मालकांनी आमचे आशिलांना दिला आहे. सबब विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत न आल्यास सदरहु मिळकतींबाबत आमचे आशिल विद्यमान मालकांबरोबर वर नमुद मिळकतींबाबत खरेदी व्यवहार करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०३.०९.२०२४

सही/-
श्री. अमित महेश्वर देशमुख
ॲडव्होकेट आणि नोटरी
सृष्टी बिल्डींग, वेधशाळेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची सदनिका मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक प्रकाश अशोक पाटील, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**सदनिका मिळकतीचे वर्णन**

**मौजे चेंढरे ता. अलिबाग येथील सर्व्हे नं. २६ हिस्सा नं. ४ प्लॉट नं. ६ क्षेत्र ०-०३-०९ हे. आर., आकार ६ रू. १८ पैसे या मिळकतीवरील मोरया टॉवर्स को. ऑप हौस. सोसा. लि. मधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. २०२, क्षेत्र २४.५८८ चौ.मी., ग्रामपंचायत चेंढरे मालमत्ता क्र. १९९९/५ हि निवासी सदनिका मिळकत या नोटीसीचा विषय आहे.**

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीवर अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, बारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, तावेकब्जा, कोर्टकचेरी बगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०६ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गृहीत धरून सदरचा विक्री व्यबहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०४/०९/२०२४
मोबा. ९९२२७०७०१२

ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे
मु. बुरूमखाण, पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड

## Anjuman Islam Janjira Murud, Murud Janjira Raigad
## REQUIRES

Applications are invited for the post of Shikshans Sevak (Clear Vacancy) from candidate for the following Aided Pri School.

| Sr. No. | Name of School | No. of Post | Qualification |
|---|---|---|---|
| 1 | Anjuman Islam Janjira Primary School Shriwardhan | 1 | TET/CTET Paper 1 |

apply within 7 days to the Gen Secretary Anjuman Islam Janjira Murud
**Email Id: aijheadoffice1907@gmail.com**
**Note :** After Scrutiny of all applications received only those candidate will be informed of the **“Walk in interview”** who satisfy of all the norms and qualification.

**Gen Secretary**
Anjuman Islam Janjira Murud

## जाहीर लिलाव

खालील नमूद गुन्ह्यातील साहित्याचा जाहीर लिलाव करून त्यातून मिळणारी रक्कम सरकार जमा करणेबाबत मा. न्यायालयाने आदेशित केला आहे.

**अलिबाग पोलीस ठाणे गु.र.नं. १९/२०२१ मधील जप्त मुद्देमालाची यादी**

| अ.नं. | वर्णन | गुन्ह्यातील किंमत |
|---|---|---|
| १ | lenovo कंपनीचे एकूण ५ इनबिल्ट हार्डडिस्क असलेले पी.सी. | २५,०००.०० |
| २ | Artis कंपनीचे एकूण ५ किबोर्ड | ५०००.०० |
| ३ | Enter कंपनीचे लाल रंगाचे एकूण ५ माऊस | १०००.०० |
| ४ | Tenda कंपनीचे सफेद रंगाचा राऊटर, चार्जर सहित | ८००.०० |

**अलिबाग पोलीस ठाणे गु.र.नं. २०/२०२१ मधील जप्त मुद्देमालाची यादी**

| अ.नं. | वर्णन | गुन्ह्यातील किंमत |
|---|---|---|
| १ | Viewsonic कंपनीचे एकूण २ मॉनिटर | १६०००.०० |
| २ | Dell कंपनीचे एकूण २ मॉनिटर | १६०००.०० |
| ३ | Made in china कंपनीचा १ मॉनिटर | ८०००.०० |
| ४ | Inter कंपनीचे एकूण ४ इनबिल्ट हार्डडिस्क असलेले सीपीयु | ८०००.०० |
| ५ | Zebronics कंपनीचे एकूण ४ इनबिल्ट हार्डडिस्क असलेले सीपीयु | २०००.०० |
| ६ | i ball कंपनीचे एकूण २ किबोर्ड | २०००.०० |
| ७ | Xpro कंपनीचे एकूण २ किबोर्ड | २०००.०० |
| ८ | Circle कंपनीचे एकूण १ किबोर्ड | १०००.०० |
| ९ | ५ माऊस | १०००.०० |
| १० | i ball कंपनीचा काळ्या रंगाचा एक राऊटर चार्जर | २०००.०० |
| ११ | ४ प्लास्टिकच्या खुर्च्या | १२००.०० |

**अलिबाग पोलीस ठाणे गु.र.नं. १८६/२०२१ मधील जप्त मुद्देमालाची यादी**

| अ.नं. | वर्णन | गुन्ह्यातील किंमत |
|---|---|---|
| १ | एक Zebster कंपनीचा मॉनिटर | ५०००.०० |
| २ | एक काळ्या रंगाचा ॲडप्टर | ५००.०० |
| ३ | intex कंपनीचा काळे रंगाचा माऊस | १००.०० |
| ४ | एक Benq कंपनीचा मॉनिटर | ५०००.०० |
| ५ | एक Circle कंपनीचा सीपीयु | ८०००.०० |

तरी इच्छुक व्यक्तींनी आपली निविदिका दिनांक ३०/०९/२०२४ पर्यंत अलिबाग पोलीस ठाणे येथे सादर करावी.

सही/-
पोलीस निरीक्षक
अलिबाग पोलीस ठाणे
अलिबाग- रायगड

## BHARTIYA EDUCATION/SOCIAL CHARITABLE TRUST'S SHETH SHREE OTARMAL SHESHMALPARMARCOLLEGE OF DIPLOMA ENGG.

(Velshet) Nagothane, Tal. Roha, Dist. Raigad 402106
Phone: (02194)-222522 | Fax: (02194)-222523 I M.: 8826011877
E principalssosp@gmail.com lkjssosp@gmail.com IW www.osparmarpolytechnic.com
(Approved By:AICTE, New Delhi) I DTE Code: D3288 | MSBTE Code: 1145

**प्रथम वर्ष पदविका प्रवेश**
**प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२४-२५**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तिसऱ्या (CAP-३) फेरी नंतर शेठ श्री ओटरमल शेषमल परमार कॉलेज ऑफ डिप्लोमा इंजिनीअरिंग वेलशेत नागोठणे, येथे रिक्त राहणाऱ्या जागा संस्थास्तरावर भरण्याचे नियोजित करण्यात आलेले आहे. माहिती पदविका प्रवेश २०२४-२५ नियम क्रमांक १३ अन्वये सदरची प्रवेश प्रक्रिया शेठ श्री ओटरमल शेषमल परमार कॉलेज ऑफ डिप्लोमा इंजिनीअरिंग वेलशेत नागोठणे या संस्थेत दिनांक ०६/०९/२०२४ रोजी सकाळी ०९:३० वाजल्यापासून सुरु करण्यात येणार आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी सर्व मूळ कागदपत्रे व आवश्यक शुल्काची रक्कम घेऊन संस्थेत ठीक ०९:३० वाजता उपस्थित राहावे.

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमूद जमीन मालक १. श्री. नरेश दत्तात्रय गवंडी, २. श्री. रमेश दत्तात्रय गवंडी, ३. श्री. विलास दत्तात्रय गवंडी, ४. श्री. मदन दत्तात्रय गवंडी, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे - सांडशी, ता. कर्जत, जि. रायगड, येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ८/१/ब/ १ | ०.५५.४०<br>पो.ख. ०.०३.३०<br>एकूण : ०.५८.७० | ५.८८ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दूसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करून पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत दि. ०५/०९/२०२४

कळावे
ॲड. संदिप मारूती घरत
ऑफिस:- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला,
ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड, पिन ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाईन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. रविकांत भाऊ म्हात्रे रा. नेरुळ गांव, नवी मुंबई, श्री. राजेश काशिनाथ पाटील रा. गावदेवी प्रसाद, नेरुळ, नवी मुंबई यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत सदर जमिन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मितेश महादेव नाईक वगैरे ४ यांचेकडून रजिस्टर्ड खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी सुरु आहेत.

**मिळकतीचे वर्णन :** जिल्हा रायगड, पोट तुकडी पेण, पंचायत समिती पेण, मे. दुय्यम निबंधक पेण यांचे कार्य क्षेत्रातील ग्रुप ग्रामपंचायत पाबळ, मौजे कोंढवी येथील जमिन मिळकतीचे ७/१२ वरुन वर्णन खालील प्रमाणे.

| गट क्र. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पैसे |
|---|---|---|
| ४७ | ३-३३-९० | ९-९३ |

पैकी श्री. मितेश महादेव नाईक व श्री. मिलींद महादेव नाईक यांचे अविभक्त हिश्श्याचे ०-८३-० हे.आर.चौ.मी. एवढे क्षेत्र या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशीर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाले दिवशीपासून १४ (चौदा) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर सदर जाहीर नोटीसीस वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजुन माझे अशिल विद्यमान मालकांबरोबर खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

पेण-रायगड
दि. ०४/०९/२०२४

सही/-
ॲड. संजय भास्कर पाटील
परमार प्लाझा, शॉप नं. १६.
तळ मजला, शिवाजी पथ,
पेण, पेण- रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

## : कर्मचारी पाहीजेत :

सर्व लोकांना जाहीरपणे कळविण्यात येत आहे की, आमचे मु.पो. कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड येथे ‘‘**प्रांश मार्ट सुपर मार्केट**’’ या नावाने सुपर मार्केट असून सदर सुपर मार्केट मध्ये खालील कामगारांची आवश्यकता आहे.

१. मॅनेजर पदा करिता
शिक्षण - कमीत कमी १५ वी
वय मर्यादा २२ ते ३० वर्ष
पगार- प्रत्यक्ष ठरविण्यात येईल.

२. सेल्स मॅनेजर पदा करिता
शिक्षण - कमीत कमी १२ वी
वय - मर्यादा २२ ते ३० वर्षे
पगार- प्रत्यक्ष ठरविण्यात येईल.

३.परचेस मॅनेजर पदा करिता
शिक्षण- कमीत कमी १२ वी
वय मर्यादा २२ ते ३० वर्ष
पगार- प्रत्यक्ष ठरविण्यात येईल.

वर वर्णन केलेल्या नोकरी करीता दि. ११/९/२०२४ रोजी सकाळी ९:३० वाजता प्रांश मार्ट सुपर मार्केटच्या वर दुसऱ्या मजल्यावर इंटरव्ह्यू घेण्यात येतील. तरी इच्छूक सदस्यांनी सदर वेळेत सदर ठिकाणी हजर रहावे.
अट- १. सदर नोकरी करीता सदर मार्टच्या १० कि.मी मधील सदस्यांना प्राधन्य देण्यात येईल.
२.प्रथम येणाऱ्या सदस्यांचा इंटरव्ह्यू घेण्यात येईल सदर इंटरव्ह्यूमध्ये पास होणाऱ्या आणी मालकाला योग्य वाटल्यास सदर पदावर नियुक्ती करण्यात येईल.
३.पदावर घेण्याचा पूर्ण अधिकार हा मालकास असणार आहे.

ठिकाण - उरण
दिनांक : ०५/०९/२०२४

सौ. अक्षता म्हात्रे
प्रो. प्रा. प्रांश मार्ट सुपर मार्केट
९९३०८८३९४१

## जाहीर नोटीस

अर्ज क्र.१३४/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. हाजिमियाँ इस्माईल करदेकर
वय : ६४ वर्षे, धंदा : शेती, — अर्जदार
रा. मु. नाणोरे, पो. बामणोली,
ता. माणगांव जि. रायगड.

विरूध्द

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
माणगांव नगरपंचायत माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव, — सामनेवाला
ता. माणगांव, जि. रायगड.
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. हाजिमियाँ इस्माईल करदेकर यांची मुलगी श्रीम. सलमा हाजिमियाँ करदेकर - लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. सलमा अकबर माटवणकर- लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे नाणोरे, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. २६/१०/१९८२ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना क्र. मानपं / जन्म - मृत्यू / ६९५ / २०२४-२५ ने दि. २९/०७/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची मुलगी श्रीम. सलमा हाजिमियाँ करदेकर- लग्नापूर्वीचे नाव श्रीम. सलमा अकबर माटवणकर - लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे नाणोरे, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. २६/१०/१९८२ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. हाजिमियाँ इस्माईल करदेकर यांची मुलगी श्रीम. सलमा हाजिमियाँ करदेकर-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. सलमा अकबर माटवणकर - लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे नाणोरे, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. २६/१०/१९८२ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता : ०२/०९/२०२४

सही /-
कार्यकारी दंडाधिकारी माणगाव

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, शिल्पा गणपत कांबळे, रा. महागाव, ता. सुधागड, जि. रायगड यांनी या कार्यालयात स्वतःच्या जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे. सदर अर्जात त्यांनी प्रतिज्ञापत्राद्वारे त्यांचा जन्म दि. २८ जून १९८६ रोजी मौजे-महागाव, ता. सुधागड, जि. रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे नमूद केले आहे.

सदरहू शिल्पा गणपत कांबळे यांच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसीद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

सदर नोटीस पेपर प्रसिद्धीकरीता माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली आहे.

ठिकाण : सुधागड-पाली
दिनांक : १३/०८/२०२४

सही/-
(उत्तम कुंभार)
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी सुधागड

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय तहसिलदार कार्यालय मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जिल्हा रायगड)

ज.म.र. अर्ज १६६/२०२४

**जाहिर नोटीस**

श्रीमती सुषमा गणेश कांबळे.
रा. आबीटघर, ता. मुरुड-जंजिरा — अर्जदार
जिल्हा रायगड.
विरुद्ध
ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत मांडला, ता.मुरुड, — सामनेवाला
जिल्हा रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार सुषमा गणेश कांबळे यांचा जन्म दिनांक ०९/०७/१९८४ रोजी आबीटघर ता. मुरुड-जंजिरा, जिल्हा रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद नांदगांव ग्रामपंचायत कार्यालय यांचे जन्म/मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲन्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार सुषमा गणेश कांबळे यांचा दिनांक ०९/०७/१९८४ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलांमार्फत मे. न्यायालयांत दि.२५/०९/२०२४ रोजी सकाळी ११-०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांना जन्म/मृत्यू नोंद रजीस्टर मध्ये जन्माची नोंद होणे करीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १४/०८/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. कळावे.

सही/-
(रोहन शिंदे)
तहसिलदार मुरुड-जंजिरा

निवडक

## मिशन बांगलादेश

**मुंबई** : भारत आणि बांगलादेश यांच्यातील कसोटी मालिकेतील पहिला सामना १९ सप्टेंबरपासून खेळवला जाणार आहे. हा सामना चेन्नईत होणार आहे. भारत आणि बांगलादेश यांच्यात दोन कसोटी सामने होणार आहेत. यासाठीची टीम लवकरच जाहीर होऊ शकते. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ मैदानात उतरणार आहे. टीम इंडिया अनुभवी खेळाडूंबरोबरच युवा खेळाडूंनाही संधी देऊ शकते. पण ते त्याच्या सध्याच्या फॉर्मवर अवलंबून असेल. सर्फराज खान आणि ध्रुव जुरेल यांना संधी मिळू शकते.

## सुआरेझ घेणार निवृत्ती

**मोंटेवीडियो** : उरुग्वेचा अनुभवी स्ट्रायकर लुईस सुआरेझ याने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्तीची घोषणा केली. लिव्हरपूल आणि बार्सिलोना क्लबकडून खेळलेल्या या ३७ वर्षीय खेळाडूने उरुग्वेकडून १४२ सामन्यांत ६९ गोल केले आहेत. हा उरुग्वेकडून नोंदवलेला विक्रम आहे. सुआरेझ आपला अखेरचा आंतरराष्ट्रीय सामना शुक्रवारी पॅराग्वे विरुद्ध खेळणार आहे. उरुग्वे शुक्रवारी विश्वचषक पात्रता सामन्यात पॅराग्वेचे यजमानपद भूषविणार आहे. सुआरेझने २००७मध्ये आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये पदार्पण केले.

## अजय रात्रा यांची नियुक्ती

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने मंगळवारी वरिष्ठ पुरुष संघाच्या निवड समितीबाबत मोठी घोषणा केली आहे. बीसीसीआयच्या क्रिकेट सल्लागार समितीने निवड समितीमध्ये अजय रात्रा यांची नवे सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. मुंबईचे माजी क्रिकेटपटू सलील अंकोला यांची ते जागा घेतील. अजय रात्रा यांनी भारतासाठी ६ कसोटी आणि १२ वनडे सामने खेळले आहेत. त्यांनी प्रथम श्रेणीचे ९९ सामने खेळले असून ४००० हजारांहून अधिक धावा केल्या आहेत.

## नवारोची उपांत्यफेरीत धडक

**न्यूयॉर्क** : अमेरिकन टेनिस स्टार एम्मा नवारोने मंगळवारी यूएस ओपन टेनिस स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. जिथे गुरुवारी तिची दुसऱ्या मानांकित अरिना सबालेन्काशी लढत होईल. त्याचवेळी पुरुष एकेरीत चौथा मानांकित अलेक्झांडर झ्वेरेव अपसेटचा बळी ठरला आहे. अमेरिकेच्या टेलर फ्रिट्झने त्याचा पराभव करत टॉप-४ मध्ये आपले स्थान पक्के केले. २३ वर्षीय नवारोने महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत स्पेनच्या पॉला बेडोसाचा ६-२, ७-५ असा सरळ सेटमध्ये पराभव केला.

## मॅक्युलम इंग्लंडचा कोच

**नवी दिल्ली** : इंग्लंडने ब्रेंडन मॅक्युलमला कसोटी संघाचा मुख्य प्रशिक्षक, तसेच वनडे आणि टी-२० संघांचा प्रशिक्षक बनवले आहे. पुढील वर्षी जानेवारीत होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी मॅक्युलम आपले पद स्वीकारणार आहे. त्याच्या प्रशिक्षणाखाली संघ भारतात ५ टी-२० मालिका खेळणार आहे. मे २०२२ मध्ये तो इंग्लंडचा कसोटी प्रशिक्षक बनला होतो. चांगले निकाल पाहता बोर्डाने त्याचा कार्यकाळ २०२७ पर्यंत वाढवला. तो एकदिवसीय क्रिकेटमध्येही संघाचे प्रशिक्षक असणार आहे.




# भारताची पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये रेकॉर्डब्रेक कामगिरी

### ■ अवघ्या सहा दिवसांत सर्वाधिक पदकं जिंकण्याचा केला विक्रम

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

**पॅरालिम्पिकमध्ये भारतीय पॅरा अॅथलिटने ६ दिवसांत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताने २० पदकांचा टप्पा गाठून भारताने सर्वाधिक पदके जिंकण्याचा नवा इतिहास रचला आहे. भारताच्या खात्यात आता एकूण २० पदके आहेत. यामध्ये ३ सुवर्ण, ७ रौप्य आणि १० कांस्य पदकांचा समावेश आहे.**

पॅरिसपूर्वी भारताने टोकियो २०२० मध्ये पॅरालिम्पिक स्पर्धेत सर्वाधिक पदके जिंकण्याचा विक्रम केला होता. टोकियो पॅरालिम्पिकमध्ये भारताने एकूण १९ पदके जिंकली होती. पण आता पॅरिसमध्ये पहिल्या ६ दिवसातच भारतीय पॅरा अॅथलिट्सने पॅरालिम्पिक स्पर्धेच्या इतिहासातील सर्वोत्तम कामगिरीचा विक्रम मोडीत काढला आहे.

पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताने आतापर्यंत ४ खेळांमध्ये पदकं जिंकली आहेत. त्यापैकी सर्वाधिक १० पदकं अॅथलेटिक्समधून आली आहेत. त्याचबरोबर बॅडमिंटनमध्ये ५ तर नेमबाजीत ४ पदके आली आहेत. तिरंदाजीतून एक पदक मिळाले आहे. भारताने ३ सप्टेंबरला म्हणजेच सहाव्या दिवशी ५ पदकं जिंकली. दीप्ती जीवनजी, शरद कुमार, मरियप्पन थांगावेलू, अजित सिंग आणि सुंदर गुर्जर यांनी ही पदकं जिंकली.

बुधवारी, पुरुषांच्या भालाफेक फायनलमध्ये, अजित सिंगने ६५.६२ मीटरच्या वैयक्तिक सर्वोत्तम थ्रोसह रौप्यपदक जिंकले आणि सुंदर सिंग गुर्जरने ६४.९६ मीटरच्या हंगामातील सर्वोत्तम थ्रोसह कांस्यपदक जिंकले. पॅरिस पॅरालिम्पिकमधील अॅथलेटिक्समधील भारताचे हे पहिले दुहेरी पदक होते.

पुरुषांच्या उंच उडी फायनलमध्ये भारताच्या दोन्ही खेळाडूंनी पदकं जिंकली. शरद कुमार (४२) याने १.८८ मीटरच्या सर्वोत्कृष्ट उडीसह रौप्य पदक जिंकले आणि ४२ प्रकारात नवीन पॅरालिम्पिक विक्रमही केला. शरदने टोकियो २०२१ मध्ये जिंकलेल्या कांस्यपदकाचे पॅरिस २०२४ मध्ये रौप्यपदकात रूपांतर केले. तर, मरियप्पन थांगावेलू (४२) याने १.८५ मीटरच्या सर्वोत्तम उडीसह कांस्यपदक जिंकले.

२००८ बीजिंग पॅरालिम्पिकमध्ये भारताला पदक पटकावता आले नाही आणि २०१२ लंडन पॅरालिम्पिकमध्ये केवळ एका पदकावर समाधान मानावे लागले. २०१६ च्या रिओ पॅरालिम्पिकमध्ये भारताने ४ पदके जिंकली होती. त्यानंतर टोकियो पॅरालिम्पिकमध्ये भारताने १९ पदकं जिंकून नवा विक्रम घडवला होता.

### पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताची कामगिरी

**भारत १९६८ पासून पॅरालिम्पिक खेळांमध्ये सहभागी होत आहे. पहिल्या पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताचे खातेही उघडले नव्हते. यानंतर १९७२ मध्ये भारताला पहिले सुवर्णपदक मिळाले. भारताने पुढच्या २ पॅरालिम्पिकमध्ये भाग घेतला नाही, पण १९८४ मध्ये भारतीय पॅरा अॅथलिट ४ पदकं जिंकण्यात यशस्वी झाले. यानंतर पुन्हा एकदा भारताला पुढील ४ पॅरालिम्पिकमध्ये खातेही उघडता आले नाही. त्यानंतर २००४ च्या अथेन्स पॅरालिम्पिकमध्ये भारताने २ पदकांची कमाई केली होती.**

### बोपण्णा-सुतजियादी उपांत्य फेरीत

# अमेरिकन खुली टेनिस स्पर्धा

**। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।**

भारताचा अनुभवी टेनिसपटू रोहन बोपण्णा आणि त्याची इंडोनेशियाची जोडीदार अल्दिला सुतजियादी यांनी अमेरिकन खुल्या ग्रँडस्लॅम स्पर्धेतील मिश्र दुहेरीची उपांत्य फेरी गाठली आहे. त्यामुळे बोपण्णाने कारकीर्दीमधील मिश्र दुहेरी गटातील दुसऱ्या ग्रँडस्लॅम विजेतेपदाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकल्याचे बोलले जाते.



ऑस्ट्रेलियाच्या मॅथ्यू एब्डेनसह खेळताना बोपण्णाचे पुरुष दुहेरीतील आव्हान उपउपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आले. त्यानंतर पुढील दिवशीच बोपण्णा आणि एब्डेन हे मिश्र दुहेरीत आमनेसामने आले. या वेळी अधिक जोमाने खेळ करणाऱ्या बोपण्णाला बाजी मारण्यात यश आले. आठव्या मानांकित

### ■ चुरशीच्या लढतीत चौथ्या मानांकित एब्डेन क्रेजिकोवा जोडीला धक्का

बोपण्णा-सुतजियादी जोडीने संघर्षपूर्ण लढतीत चौथ्या मानांकित एब्डेन-बार्बोरा क्रेजिकोवा जोडीला ७-६ (७-४), २-६, १०-७ असे पराभूत केले. ही लढत एक तास आणि ३३ मिनिटे चालली. आता उपांत्य फेरीत बोपण्णा-सुतजियादी जोडीसमोर यजमान अमेरिकेच्या डोनाल्ड यंग आणि टेलर टाऊंसएंड जोडीचे आव्हान असेल. ४४ वर्षीय बोपण्णाने या वर्षीच्या सुरुवातीला एब्डेनच्या साथीने ऑस्ट्रेलियन खुल्या स्पर्धेत पुरुष दुहेरीचे जेतेपद पटकावले होते. अखेरच्या ग्रँडस्लॅम स्पर्धेत मिश्र दुहेरीत जेतेपदाची बोपण्णाकडे संधी आहे.

# मुंबई क्रिकेट संघटनेच्या सचिवपदी अभय हडप

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

मुंबई क्रिकेट संघटनेच्या (एमसीए) सचिवपदी अभय हडप यांची निवड करण्यात आली आहे. मंगळवारी झालेल्या निवडणुकीत हडप यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी सूरज सामत यांना १९६-१४१ अशा फरकाने पराभूत केले. या निवडणुकीत ३३७ सदस्यांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. अजिंक्य नाईक हे एमसीएच्या अध्यक्षपदी निवडून आल्यानंतर सचिवपद रिक्त झाले होते. विशेष म्हणजे हडप आणि सामत दोघेही कार्यकारी परिषदेचे सदस्य असल्याने आता पुन्हा एकदा लवकरच एमसीएमध्ये निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे.

माझा आनंद शब्दात व्यक्त करू शकत नाही. मी कधी सचिव होईल, असा विचारही केला नाही. आता या पदावर आल्यावर पायाभूत सुविधा आणि मैदान, तसेच कर्मचाऱ्यांसाठी मला खूप काही गोष्टी करायच्या आहेत. माझ्याकडे आता एका वर्षाचा कालावधी आहे. मुंबई क्रिकेट आणि मैदानांसाठी हा कार्यकाळ पुरेसा आहे. मी आता अध्यक्ष अजिंक्य नाईक आणि कार्यकारी परिषदेच्या सदस्यांसह मुंबई क्रिकेटला आणखी उंचीवर नेण्यासाठी मेहनत करेन, असे हडप यांनी सांगितले.

वरळीच्या आदर्श नगर येथील रहिवासी असलेले हडप मुंबईच्या मैदानात वर्षभर स्पर्धांचे पद्धतशीर आयोजन करण्यासाठी ओळखले जातात हडप यांनी गेली २५ वर्षे मैदान क्रिकेटमध्ये काम पाहिले आहे. मी लहान असताना अजित नाईक १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत खेळलो आहे. ही स्पर्धा सुरू करणाऱ्यांपैकी ते एक होते. आजही ते या स्पर्धेच्या आयोजनात सक्रिय सहभाग नोंदवतात. गेल्या हंगामात एमसीए स्पर्धांच्या आयोजनातही त्यांची भूमिका महत्त्वाची होती, असे एमसीएफ अध्यक्ष अजिंक्य नाईक यांनी सांगितले.

# बांगलादेशचा पाकला क्लीन स्वीप

**। रावळपिंडी । वृत्तसंस्था ।**

बांगलादेशने क्रिकेटच्या इतिहासात प्रथमच पाकिस्तानविरुद्ध कसोटी मालिका जिंकली आहे. रावळपिंडी येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या सामन्यात मंगळवारी शेवटच्या दिवशी या संघाने पाकिस्तानचा ६ गडी राखून पराभव केला. बांगलादेशकडून लिटन दासने पहिल्या डावात शतक झळकावले. बांगलादेशने पहिल्या कसोटी सामन्यात पाकिस्तानवर १० विकेट्सने ऐतिहासिक विजय नोंदवला होता. यासह नझमुल हुसैन शांतोच्या नेतृत्वाखालील संघाने दोन सामन्यांची कसोटी मालिका २-० अशी जिंकली. याआधी उभय संघांमध्ये ५ कसोटी मालिका खेळल्या गेल्या होत्या आणि त्या सर्व पाकिस्तानने जिंकल्या होत्या. दोन्ही संघ २००१ मध्ये पहिल्यांदा कसोटी खेळले होते.

पाकिस्तानी संघ सोमवारी दुसऱ्या डावात १७२ धावांत सर्वबाद झाला. संघाने बांगलादेशला विजयासाठी १८५ धावांचे लक्ष्य दिले होते. मंगळवारी बांगलादेशने आपला दुसरा डाव ४२ धावांवरून खेळण्यास सुरुवात केली. कर्णधार नझमुल हुसेन शांतो आणि मोमिनुल हक यांच्यात ५७ चेंडूत ११९ धावांची भागीदारी झाली. संघाकडून झाकीर हसनने ४०, शांतोने ३८, मोमिनुलने ३४, शदमान इस्लामने २४ धावा केल्या. रविवारी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी बांगलादेशचा संघ पहिल्या डावात सर्वबाद २६२ धावांवर आटोपला. एकवेळ संघाने २६ धावांत ६ विकेट गमावल्या होत्या. येथे लिटन दास आणि मेहदी हसन यांनी १६५ धावांची भागीदारी करत संघाला १९० च्या पुढे नेले. लिटनने १३८ आणि मेहदी हसनने ७८ धावा केल्या. पाकिस्तानकडून खुर्रम शहजादने ६ बळी घेतले.

# एमसीए आयोजित पंचांच्या मुख्य लेखी परीक्षेत रायगड जिल्ह्यातील आठ पंच उतीर्ण

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र क्रिकेट असिसिएशनच्यावतीने आयोजीत केलेल्या क्रिकेट पंचांच्या मुख्य लेखी परीक्षेचा निकाल एमसीएकडून जाहीर करण्यात आला. त्यामध्ये महाराष्ट्र क्रिकेट असिसिएशनच्या अधिकार क्षेत्रातील २१ जिल्ह्यातील पंचांनी परीक्षेसाठी सहभाग घेतला होता. त्यामध्ये रायगड जिल्ह्यातील आठ पंच उत्तीर्ण झाले आहेत.

वरुण म्हात्रे-उरण, विघ्नहर्ता मुंढे-पनवेल, सागर मुळे-पेण, रोहन पाटील-उरण, अभिजित वाडकर-अलिबाग, चंद्रकांत चौधरी-कर्जत, निशांत माळी- रसायनी, प्रशांत माळी-उरण अशी त्यांची नावे आहेत.

येत्या सप्टेंबर महिन्यात त्यांची प्रॅक्टिकल परीक्षा आहे. महाराष्ट्रातील सर्व पंचांना एमसीएच्यावतीने ऑनलाईन व




कार्यशाळेच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले. तसेच रायगड जिल्ह्यातील पांचासाठी जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्यावतीने माजी रणजी खेळाडू व विद्यमान बीसीसीआय पंच हर्षद रावले, मुंबई क्रिकेट असोसीएशनसे पंच राजन कसबे व रायगड जिल्ह्यातील क्रिकेट तज्ञ नयन कट्टा यांनी गेले दोन महिने अथक परिश्रम घेऊन ऑनलाइन व कार्यशाळाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. या पुढेही करत रहाणार आहेत. पंच शिबिरासाठी विनामूल्य हॉल आरडीसीएचे उपाध्यक्ष यशवंत साबळे खोपोली व डी.के भोईर उरण यांनी उपलब्ध करून दिला. तसेच सर्व पंचाना मार्गदर्शन मिळावे यासाठी अॅड. पंकज पंडित, प्रदीप खलाटे, शंकर दळवी, सुयोग चौधरी यांनी परिश्रम घेतले.सर्व उतीर्ण झालेल्या पंचांचे आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुध्द पाटील, सचिव प्रदिप नाईक यांच्यासह सर्व पदाधिकारी, सदस्य, खेळाडू, क्रिकेट प्रेमींनी अभिनंदन केले.

# सुरेश रैनाला न्याय मिळाला!

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भारताचा माजी क्रिकेटपटू सुरेश रैनाचे काका अशोक कुमार यांची निर्घृणपणे हत्या झाली होती. चार वर्षांनी सुरेश रैना आणि त्याच्या कुटुंबियांना न्याय मिळाला. १२ दोषींना न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. पठाणकोट जिल्ह्यातील थारियाल गावातील घराच्या टेसेरवर १९ ऑगस्ट २०२० च्या रात्री रैनाची मावशी आशादेवी, काका अशोक कुमार यांचे कुटुंब झोपले होते. त्यावेळी दरोड्याच्या उद्देशाने काही लोक घरात शिरली. त्यांना विरोध केला असता त्यांनी कुटुंबियांवर धारदार शस्त्रांनी वार केले. बव्हेरिया टोळीच्या या हल्ल्यात अशोक कुमार जागीच ठार झाले, तर आशा देवी (५५), मावशीचा मोठा मुलगा कौशल कुमार (३२), लहान मुलगा अपिन कुमार (२४) आणि मावशीच्या सासूबाई सत्या देवी ( ८०) या गंभीर जखमी झाल्या होत्या.

# किड्स स्पोर्ट्स कार्निवल बोरीवलीत उत्साहात संपन्न

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

प्रज्ञा वर्धिनी फाऊंडेशन आणि मॅक्सज्ञान स्पोर्ट्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या किड्स स्पोर्ट्स कार्निवल या आगळ्यावेगळ्या आंतरशालेय उपक्रमाला विद्यार्थी व पालकांचा छान प्रतिसाद मिळाला. सुविद्या स्पोर्ट्स अकॅडमी गोराई, बोरीवली (पश्चिम) या ठिकाणी या कार्निवलचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी माजी खासदार गोपाळ शेट्टी आणि वीरमाता अनुराधाताई गोरे यांनी उपस्थित राहून १५ शाळांमधून साडेआठशे पालक आणि मुलं यांना खेळाचे महत्व समजून सांगितले. अनुराधाताई गोरे आणि गोपाळ शेट्टी यांनी या वेळी आयोजकांचे, सर्व मुले, पालकांचे कौतुक करून खेळ आपल्याला शिस्तबद्धता आणि योग्य संयम शिकवतात, असे सांगितले. येणाऱ्या काळामध्ये मुंबई उपनगरात स्पोर्ट्स हब बनविण्याचे उद्दिष्ट असल्याचे गोपाळ शेट्टी यांनी सांगितले. यावेळेस प्रज्ञावर्धिनी फाऊंडेशनच्या मॅनेजिंग ट्रस्टी अॅड. रूपाली ठाकूर, वैशाली भिडे बर्वे, महादेव गोविंद रानडे, सुविद्या प्रसारक संघाचे माजी अध्यक्ष डॉ. वसंत खटाव, विल्फ्रेड मेनेझेस, एमसीएचे क्रिकेट प्रशिक्षक नागेश ठाकूर आदी उपस्थित होते.



# लॉर्ड्सवर ११ जूनपासून कसोटी चॅम्पियनशिप फायनल

**। दुबई । वृत्तसंस्था ।**

■ इंग्लंड तिसऱ्यांदा यजमानपद भूषवणार

■ १६ जून हा राखीव दिवस

जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या चालू हंगामातील अंतिम सामना पुढील वर्षी ११ ते १५ जून दरम्यान लॉर्ड्स स्टेडियमवर खेळवला जाईल. आयसीसीने मंगळवारी विजेतेपदाच्या सामन्याची तारीख आणि ठिकाण जाहीर केले. १६ जून हा राखीव दिवस म्हणून ठेवण्यात आला आहे.

लंडनमधील लॉर्ड्स स्टेडियम प्रथमच फायनलचे आयोजन करणार आहे. अंतिम सामना पॉइंट टेबलमधील टॉप-२ संघांमध्ये होईल. सध्या भारतीय संघ ६८.५२ टक्के गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. तर ऑस्ट्रेलिया (६२.५०%) दुसऱ्या स्थानावर आहे.

इंग्लंड तिसऱ्यांदा वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलचे यजमानपद भूषवणार आहे. चॅम्पियनशिपचा पहिला अंतिम सामना साउथॅम्प्टन येथील रोझ बाउल मैदानावर खेळला गेला, तर दुसरा अंतिम सामना लंडनमधील ओव्हल मैदानावर आयोजित करण्यात आला.

भारतीय संघ कसोटी चॅम्पियनशिपच्या दोन्ही अंतिम फेरीत पोहोचला आहे.

### खेळाडूंसाठी फ्रँचायझींनी मोजली मोठी किंमत....

# प्रो कबड्डीच्या 11 व्या हंगामाला 18 ऑक्टोबरपासून सुरुवात

**। नवीदिल्ली । वृत्तसंस्था ।**

प्रो कबड्डीच्या ११ व्या हंगामाचा लिलाव ऑगस्टमध्ये मुंबईत पार पडला. या लिलावात अनेक युवा आणि अनुभवी खेळाडूंसाठी फ्रँचायझींनी मोठी किंमत मोजल्याचे दिसले. एकूण आठ खेळाडूंना एक कोटीहून जास्त रक्कम मिळाली. हा प्रो कबड्डीच्या लिलावातील एक नवा विक्रमही ठरला. आता यंदाच्या हंगामाच्या तारखा आणि ठिकाणांबद्दल मोठी घोषणा करण्यात आली आहे. प्रो कबड्डीचा यंदाचा मोसम १८ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे.

हैदराबाद, ग्रेटर नोएडा आणि पुणे ही तीन ठिकाणे यंदाच्या हंगामातील सामन्यांसाठी निश्चित करण्यात आली आहेत. स्पर्धेची सुरुवात १८ ऑक्टोबरपासून हैदराबाद येथील गछीबोवली इनडोअर स्टेडियममधून होईल. त्यानंतर १० नोव्हेंबरपासून दुसरा टप्पा नोएडा येथील इंडोर स्टेडियम येथे तर तिसरा टप्पा ३ डिसेंबरपासून पुण्यातील बालेवाडी बॅडमिंटन स्टेडियम येथे होणार आहे. म्हणजे एका ठिकाणी २३ दिवस सामने



रंगणार आहेत. गत मोसमापर्यंत सर्व संघ आपापल्या शहरात सामने खेळत होते. मात्र, यंदा तीनच शहरांत स्पर्धा खेळवली जाणार आहे.

तथापी प्लेऑफच्या तारखा आणि ठिकाण नंतर जाहीर करण्यात येतील, असे सांगण्यात आले आहे.

११ व्या हंगामाच्या तारखांची घोषणा करताना प्रो कबड्डी लीगचे संचालक अनुपम गोस्वामी यांनी आशा व्यक्त केली की १० वा हंगाम यशस्वी पूर्ण केल्यानंतर आता नवा ११ वा हंगाम त्याहून अधिक लोकप्रिय होईल. यामुळे भारत आणि जगभरातील कबड्डीच्या वाढीला बळकटी मिळेल. अनेक हंगामांप्रमाणे ११ व्या हंगामातील सामन्यांचेही थेट प्रशिक्षप स्टार स्पोर्ट्स आणि डिज्नी प्लस हॉटस्टारवर केले जाणार आहे.

त्यामुळे कबड्डी प्रेमींसाठी ही पर्वणीच ठरणार आहे.

### प्रो कबड्डीचे आत्तापर्यंतचे विजेते

**पहिला हंगाम – जयपूर पिंक पँथर्स**
**दुसरा हंगाम – यु मुम्बा**
**तिसरा हंगाम – पटना पायरेट्स**
**चौथा हंगाम – पटना पायरेट्स**
**पाचवा हंगाम – पटना पायरेट्स**
**सहावा हंगाम – बेंगळुरू बुल्स**
**सातवा हंगाम – बेंगाल वॉरियर्स**
**आठवा हंगाम – दबंग दिल्ली केसी**
**नववा हंगाम – जयपूर पिंक पँथर्स**
**दहावा हंगाम – पुणेरी पलटण**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)